मूळ संस्कृत श्लोकांसह

मराठी अनुवाद

श्रीपाद काळे

ऋग्वेद

भाग १७



पंचम मंडलम्

तृतीय खंड

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

॥ऋग्वेद संहिता॥

भाग १७

पंचम मंडलम्

तृतीय खंड

सूक्त ४५ ते ६६

मूळ संस्कृत + मराठी

मराठी अनुवाद – **श्री. श्रीपाद काळे**

सहाय्य- **डॉ. हेमंत विंझे**

सौ. आशा कऱ्हाडे

॥ऋग्वेद संहिता॥

भाग १७

पंचम मंडलम् (तृतीय खंड)

सूक्त ४५ ते ६६

लेखक: श्री. श्रीपाद काळे

भ्रमण ध्वनि नंबर 9869447431

ईमेल shripadykale@ gmail.com

सहाय्य-

डॉ. हेमंत विंझे -drvinze@gmail.com

सौ. आशा कऱ्हाडे- ashakarhade@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : २९ ऑगस्ट २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

अनुवादक टीम परिचय

प्रा. श्रीपाद काळे, मुंबईतील विल्सन महाविद्यालयात १९७७ सालापासून फिजिक्स विषय शिकवत होते. २००८ सेवा निवृत्ती स्वीकारून मुंबईतील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकात स्वेच्छेने अनेक लोकोपयोगी कामे करत आहेत. नोकरीच्या काळामध्ये शिक्षकांना सेवा प्रशिक्षण, ऑलंपियाड सारख्या परीक्षांचे आयोजन करत होते. विद्यार्थ्यांसाठी फिजिक्स विषयाची गोडी लावण्यासाठी प्रयोग केले.

डॉ. हेमंत विंझे अनेक वर्षे सर्जन म्हणून कार्यरत होते. विज्ञानावरील त्यांच्या पुस्तकांना राष्ट्रीय पारितोषिके मिळाली आहेत. त्यांना स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्यांना बेस्ट सिटीजन ऑफ इंडिया हे इंटरनॅशनल पब्लिशिंग हाऊस यांचे पारितोषिक सुद्धा मिळाले आहे.

सौ. आशा गोपाळकृष्ण कऱ्हाडे. (एम्. ए. संस्कृत.)आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना संस्कृत विषयासाठी मार्गदर्शन.Karhade channel या you tubeचॅनल वर रामरक्षा, अथर्वशीर्ष, विष्णु सहस्रनाम अशा अनेक सुप्रसिद्ध स्तोत्रांवर निरुपण केलेले आहे.

पहिल्या मंडलाचे मनोगत

मी प्रा. श्रीपाद काळे आणि माझे स्नेही डॉ. हेमंत विंझे ह्यांच्यामध्ये अनेक विषयांवर चर्चा होत असते. चर्चेमध्ये आमच्या निदर्शनास आले की वेदांचे मराठीत अनुवाद इंटरनेटच्या जंजाळात नाही. निदान आम्हा दोघांना तरी ते सापडले नाही. काही मराठी पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत.

ऋग्वेद संस्कृत वाङ्मयातील पहिला ग्रंथ आहे. प्राचीन काळापासून ऋग्वेद हा मौखिक स्वरूपात होता. अनेक ऋषींनी वेगवेगळे श्लोक लिहिले. हे श्लोक वेगवेगळ्या देवांसाठी लिहिले. गुरुपरंपरेनुसार हे श्लोक अनेकांनी पाठ केले. या सर्व श्लोकांची काही जणांनी नीट मांडणी केली. ऋग्वेद संहितेच्या २१ शाखा असल्याचा उल्लेख पतञ्जलीने आपल्या व्याकरण महाभाष्यात केला आहे. त्यामध्ये "अश्वलायन", "बाष्कल", "मांडूकेय", "शाकल" व “शांखायन” अशा ऋषींनी केलेल्या श्लोकांच्या मांडण्या प्रसिद्ध होत्या. परंतु काळाच्या ओघात फक्त शाकल ऋषींनी केलेली वर्गवारी शिल्लक राहिली आहे. आज आपण ज्या ऋग्वेदाचे पठण करतो ते शाकलऋषींनी मांडणी केलेले श्लोक आहे. शाकल ऋषींनी केलेल्या मांडणीला “शाकल संहिता” असे संबोधले जाते

शाकल ऋषींनी महत्त्वाचे श्लोक वेगवेगळ्या क्रमवारीने लावले आणि त्यांचे विभाग पाडले. या विभागांना मंडल असे म्हणतात. प्रत्येक मंडलामध्ये ऋषी आणि देवता यांच्याप्रमाणे उपविभाग केले. प्रत्येक उपविभागाला सूक्त म्हणतात. सूक्तातील श्लोकांना ऋचा म्हणतात. सर्व ऋचा या पद्य स्वरूपात आहेत. शाकल ऋषींनी तयार केलेल्या संहिते मध्ये १० मंडले, १०२८ सूक्ते,१०५५२ ऋचा आहेत.

१ जानेवारी २०२५ पासून मी आणि माझे स्नेही ह्यांनी आम्हाला कळेल असे ऋग्वेदातील ऋचांचा अनुवाद करण्यास सुरुवात केली. सुरुवातीला इंटरनेटच्या जगात इंग्रजी आणि हिंदी भाषांतरे मिळाली. मराठी अनुवाद कुठेही मिळत नव्हते. निदान आम्हाला तरी सापडले नाही. अचानक सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांनी भाषांतरित केलेल्या पुस्तकाची माहिती

मिळाली. अनेक प्रयत्नानंतर १९९६ सालची दुर्मीळ आवृत्ती आम्हाला मिळाली. ऋचांचे अनुवाद करताना आम्ही हिंदीतील डॉक्टर श्री. गंगा सहाय शर्मा, हिंदी ऋग्वेद संहिता सनातन, इंग्रजीतील डॉक्टर श्री.भीमराव सदाशिव कुलकर्णी आणि मराठीतील सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांनी केलेल्या अनुवादाचा संदर्भ वापरला आहे. सर्व अनुवाद वाचून आम्हा दोघांना जसा अर्थ कळला त्याप्रमाणे सर्वांना कळेल असे ऋचांचे भाषांतर आम्ही करत आहो. काही ऋचांचा अर्थ लावताना आम्हाला खूप वेळ लागला आणि कष्ट करावे लागले. प्रत्येक महिन्यात निदान १५ सूक्ते भाषांतर करावी असा आम्ही संकल्प केला आहे. अनुवाद क्लिष्ट होऊ नये म्हणून आम्ही पाठभेदान्चे विश्लेषण करणे टाळले आहे. एकच पाठ प्रमाण मानला आहे. वाचकाने गैरसमज करून घेऊ नये.

आम्ही केलेला अनुवाद हा लोकांपर्यंत कसा पोहोचवा याच्या विवंचनेत आम्ही दोघंही होतो. त्याच वेळेस लोकांमध्ये साहित्याची आवड निर्माण करण्यासाठी भरीव कामगिरी करणाऱ्या ईसाहित्य प्रतिष्ठानची आठवण झाली.

ई साहित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री सुनीळ सामंत ह्यांनी आम्ही केलेल्या पंधरा सुक्ताचा अनुवाद वाचून आम्हाला अनुवाद करण्यास प्रोत्साहन दिले. हा अनुवाद पुस्तक रुपात लोकांपर्यंत पोचवण्याची जबाबदारी श्री सुनीळ सामंत यांनी घेतली.

हा अनुवाद बिनचूक होण्यासाठी सौ आशा कऱ्हाडे यांनी प्रत्येक संस्कृत श्लोक वाचून मराठी व्याकरण आणि अर्थ नीट तपासून पहिला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व ऋचांमध्ये सुधारणा करून हा अनुवाद आम्ही तिघेही सादर करत आहोत. हा अनुवाद सगळ्यांना आवडेल आशा आम्ही करतो. तरीही काही त्रुटी आढळल्यास निदर्शनास आणून द्यावे ही विनंती.

श्रीपाद काळे

मनोगत

रविवार दिनांक ३० मार्च २०२५ चैत्र पाडव्यापासून ऋग्वेदातील पहिला भाग ई साहित्य प्रतिष्ठान ह्यांनी प्रकाशित केला. त्यानंतर गेल्या वर्ष अखेरी ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळातील १९१ सूक्ते आणि त्यातील २००६ ऋचाचा अनुवाद ई साहित्य प्रतिष्ठान यांनी ९ भागात प्रकाशित केला. पहिल्या भागातील सर्व १९१ सूक्त एकत्र घेऊन संपूर्ण पहिले मंडल सुद्धा ई साहित्य प्रतिष्ठानी प्रकाशित केले.

पहिले मंडल प्रकाशित करताना अनेक वाचकांनी अमूल्य अभिप्राय कळवला. त्यामुळे पुढील मंडल अनुवादित करण्यास ऊर्जा मिळत आहे

जानेवारी २०२६ पासून दुसऱ्या व तिसऱ्या मंड्लाचे काम पूर्ण केले. ही सर्व सूक्त एकच भागात प्रकाशित करत आहोत.

मे महिन्या पासून चवथे मंडल दोन भागात प्रकाशित करण्याचा संकल्प केला आहे. त्यातील हा पहिला भाग आहे.

श्रीपाद काळे

अनुवाद : श्री.श्रीपाद काळे,

सहाय्य- डॉ. हेमंत विंझे आणि सौ. आशा कऱ्हाडे

संदर्भ : डॉक्टर श्री. गंगा सहाय शर्मा,
डॉक्टर श्री.भीमराव सदाशिव कुलकर्णी,
हिंदी ऋग्वेद संहिता सनातन.
ऋग्वेदाचे मराठी भाषांतर डॉक्टर सिद्धेश्वर शास्त्री चित्राव

ऋग्वेदा बद्दल काही उपयुक्त माहिती

ऋग्वेद हा चार वेदांपैकी एक असून त्याची रचना चार वेदांमध्ये सर्वप्रथम झाली आहे असे समजण्यात येते.

ऋग्वेद संस्कृत वाङ्मयातील पहिला ग्रंथ आहे. प्राचीन काळापासून ऋग्वेद हा मौखिक स्वरूपात होता. अनेक ऋषींनी वेगवेगळे श्लोक लिहिले. हे श्लोक वेगवेगळ्या देवांसाठी लिहिले. गुरु परंपरेनुसार हे श्लोक अनेकांनी पाठ केले. या सर्व श्लोकांची काही जणांनी नीट मांडणी केली. त्यामध्ये "आश्वलायन", "बाष्कल", "मांडूकेय", "शाकल" व शांखायन सारख्या ऋषींनी श्लोकांची मांडणी केली परंतु काळाच्या ओघात फक्त शाकल ऋषींनी केलेली वर्गवारी शिल्लक राहिली आहे आपण ज्या ऋग्वेद पठण करतो ते शाकल ऋषींनी मांडणी केलेले श्लोक आहेत शाकल ऋषींनी केलेल्या मांडणीला शाकल संहिता असे संबोधले जाते

शाकल ऋषींनी महत्त्वाचे श्लोक वेगवेगळ्या क्रमवारीने लावले आणि त्यांचे विभाग पाडले. या विभागांना मंडळ असे म्हणतात. शाकल ऋषींनी श्लोकाची विभागणी केली त्याला मंडळ म्हणतात. मंडळातील प्रत्येक मंडळामध्ये ऋषी आणि देवता यांच्याप्रमाणे उपविभाग केले . प्रत्येक उपविभागाला सूक्त म्हणतात. सूक्तातील श्लोकांना ऋचा म्हणतात . सर्व ऋचा या पद्य स्वरूपाच्या आहेत. शक्कल ऋषींनी तयार केलेल्या ऋग्वेदात १० मंडले, १०२८ सूक्ते, १०५५२ ऋचा आहेत.

श्रीपाद काळे

पंचम मंडलाविषयी

ऋग्वेदाचे पाचवे मंडळ प्रामुख्याने 'अत्री मंडळ' म्हणून ओळखले जाते.

या मंडळाची मराठीत थोडक्यात आणि महत्त्वाची माहिती खालीलप्रमाणे आहे:

एकूण सूक्ते: या मंडळात ८७ सूक्ते (स्तोत्रे) समाविष्ट आहेत. त्यामुळे याचे आपण चार भाग करणार आहोत प्रत्येक भागात २२ सूक्त असतील पाचव्या महिन्यातला पहिला भाग पाठवत आहे

या मंडळातील बहुतांश सूक्तांची रचना महर्षी अत्री आणि त्यांच्या वंशजांनी (उदा. श्यावाश्व, गविष्ठिर, भौम अत्री) केली आहे. त्यामुळे याला 'अत्री मंडळ' म्हणतात

सूर्यग्रहण कथा (सूक्त ५.४०): या मंडळातील ४० व्या सूक्तामध्ये एका ऐतिहासिक खगोलीय घटनेचा उल्लेख येतो. जेव्हा राहु आणि असुर स्वरभानूने सूर्याला आपल्या अंधाराने झाकले (सूर्यग्रहण झाले), तेव्हा महर्षी अत्री यांनी आपल्या मंत्रशक्तीने आणि प्रार्थनेने सूर्याला पुन्हा प्रकाशमान केले, अशी कथा यात आढळते.

श्रीपाद काळे

ऋग्वेदामध्ये अनेक वेळा एकवीस रत्नांचा उल्लेख येतो. आमच्या ऋग्वेदाचा भाग दोन या मधील सूक्त वीस ऋचा सात त्याच्यामध्ये ही एकवीस रत्ने असा उल्लेख. त्याचे स्पष्टीकरण

ऋभूंनी आम्हाला एकवीस रत्ने (श्रेष्ठ वस्तू) द्याव्या. सायणाचार्यांच्या मतानुसार ही एकवीस रत्ने म्हणजे एकवीस यज्ञ होत.

यज्ञाचे मुख्य दोन प्रकार आहेत. श्रौत यज्ञ आणि गृह्य किंवा पाक यज्ञ. श्रौत यज्ञाचे पुन्हा दोन प्रकार आहेत हविर्यज्ञ आणि सोम यज्ञ. या तीनही प्रकारच्या यज्ञांना संस्था (form) म्हणतात. आणि त्यांचे प्रत्येकी सात प्रकार मानले आहेत. म्हणून एकूण एकवीस प्रकार होतात.

हविस्संस्था - अग्न्याधेय, अग्निहोत्र, दर्शपूर्णमास, आग्रयण, चातुर्मास्य, निरूढपशुबन्ध, सौत्रामणि

सोम संस्था - अग्निष्टोम, उक्त, षोडशी, अत्यग्निष्टोम, अतिरात्र, अप्तोर्याम, वाजपेय

गृह्य किंवा पाक संस्था - हुतं, अहुत, प्राशित, संस्कार, शूलगव, अष्टका, प्रत्यवरोहण

श्रीपाद काळे

आशिर्वाद



पब्लिक ट्रस्ट रजि. नं. : ए - १३११

ॐ

श्री स्वामी जगद्गुरु शंकराचार्य पीठ, करवीर

श्री प. प. विद्यानृसिंह भारती स्वामी (एकमेव विश्वस्त)

२३११, डी वॉर्ड, शुक्रवार पेठ, कोल्हापूर ४१६ ००२, फोन नं. : २५४१५५४/२५४०३५२

E-mail : peethkarvir@gmail.com | Website : www.shankaracharyakarveer.org

विश्वावसु शके १९४७

आषाढ शुद्ध १२ सोमवार

दि. ७/७/२०२५

श्री. डॉ. विंझे हेमंत लक्ष्मण

मुंबई. मो. 7678091629

पीठस्थ देवतेचे उत्तम आशीर्वाद व आमचे नारायण-स्मरण.

आपण ऋग्वेदाचे भाषांतर करत आहात तेही या वयात, हीच खरी कौतुकास्पद बाब आहे. आम्हाला याचा आनंद तर आहेच शिवाय स्फुरणही आहे.

खरे तर आपण ऑर्थोपेडिक्स सर्जन. अनेकांची ऑपरेशन करून आपण त्या त्या लोकांना आरोग्य मार्गी करून दिले. व त्या सर्वांच्या सदिच्छा घेतल्या. वृद्धांचे आशीर्वादही घेतले. परिणाम असा झाला की व्यावहारिक निवृत्तीनंतर ही आपण आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धं सत्कर्मी म्हणजे वेदाचे भाषांतर करण्यास लागला. खरं तर ही अत्यंत कठीण गोष्ट आहे. हे आपण अंगीकृत केलेले व्रत आपणास आनंदाच्या शिखरावर घेऊन जाईल. व संतांच्या भाषेतील आत्मिक सुख आपणास प्राप्त होईल.

यापूर्वी सुद्धा असाच प्रयत्न सुमारे ८० वर्षांपूर्वी कुरुंदवाडीचे यानी यशस्वी केला. व ऋग यजु: साम वेदांचे भाषांतर करून ते आमच्या प्रेस आले आमची रोड ५ तारीख बसून (वय ८८ वर्षे) ते अथर्ववेदाचे भाषांतर करत होते असो. कदाचित ही थोडी गफलत असेल पण आपली महती कमी नाही.

आपणास दीर्घायुरारोग्य प्राप्त होवो हीच पीठस्थ देवतेच्या चरणी प्रार्थना.

पुनश्च एकदा पीठस्थ देवतेचे अनेक आशीर्वाद व आमचे नारायण-स्मरण सर्वांस विदित व्हावे.

महानुशासनम् वर्तते

श्री. जगद्गुरु शंकराचार्य.

करवीर पीठ

कोल्हापूर

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-४५

ऋषि- सदापृण आत्रेय **देवता** – विश्वेदेवा **छन्द** त्रिष्टुप् ९ पुरस्ताज्ज्योति

विदा दिवो विष्यन्नद्रिमुक्थैरायत्या उषसो अर्चिनो गुः ।
अपावृत व्रजिनीरुत्स्वर्गाद्वि दुरो मानुषीर्देव आवः ॥१॥
आगमन करणारी, प्रकाशमान आणि आकाशाला उजळवून टाकणारी उषादेवता स्तोत्रांच्या पठणाने अंधाररूपी पर्वताची सर्व बंधने दूर सारत प्रकट झाली आहे. सूर्यदेव आकाशात वर आले असून, त्यांच्या दिव्य प्रकाशाने मानवाच्या कल्याणाच्या प्रगतीची सर्व द्वारे उघडली आहेत ॥१॥

वि सूर्यो अमतिं न श्रियं सादोर्वाद्गवां माता जानती गात् ।
धन्वर्णसो नद्यः खादोअर्णाः स्थूणेव सुमिता दृंहत द्यौः ॥२॥
सूर्यदेव आपले दिव्यतेज आणि शोभा चहूबाजूला पसरवत असतात, त्याच वेळी गायींची बंधने ओळखणारी माता उषादेवता बाहेर पडत आहे. वाळवंटातून वाहणाऱ्या वेगवान नद्या, अन्नाने आणि समृद्धीने पूर्ण होऊन वाहू लागल्या आहेत. उत्तम प्रकारे उभारलेल्या मजबूत खांबाप्रमाणे हे आकाश, घरात रोवलेल्या लाकडी खांबांप्रमाणे स्थिर होते.॥२ ॥

अस्मा उक्थाय पर्वतस्य गर्भो महीनां जनुषे पूर्व्याय ।
वि पर्वतो जिहीत साधत द्यौराविवासन्तो दसयन्त भूम॥३॥
प्राचीन काळापासून स्तुती करण्यास योग्य असलेल्या सूर्यदेवांसाठी ढग आपला गर्भ उघडून महान नद्यांना उत्पन्न करतो. सूर्यदेवांच्या

प्रकाशाची सेवा करणाऱ्या देवता पृथ्वीवरील अंधार दूर करतात. ॥३ ॥

सूक्तेभिर्वो वचोभिर्देवजुष्टैरिन्द्रा न्वग्नी अवसे हुवध्यै ।
उक्थेभिर्हि ष्मा कवयः सुयज्ञा आविवासन्तो मरुतो यजन्ति॥४॥
देवांना अत्यंत प्रिय असलेल्या आणि सुंदर अशा स्तुतियुक्त सूक्तांनी व शब्दांनी, आम्ही आमच्या रक्षणासाठी इंद्रदेवांचे आणि अग्निदेवांचे आवाहन करतो, कारण, उत्तम प्रकारे यज्ञ करणारे आणि देवांना प्रसन्न करू इच्छिणारे भूत, वर्तमान आणि भविष्य काळाचे ज्ञानी ऋषी, श्रेष्ठ स्तोत्रांद्वारे मरुद्गणांचे पूजन करतात.॥४ ॥

एतो न्वद्य सुध्यो भवाम प्र दुच्छुना मिनवामा वरीयः ।
आरे द्वेषांसि सनुतर्दधामायाम प्राञ्चो यजमानमच्छ॥५॥
आज आपण सर्वजण श्रेष्ठ बुद्धीचे बनूया. आपण एकत्र येऊन आपल्या अमंगल शक्तींचा पूर्णपणे नाश करून श्रेष्ठ सुख प्राप्त करूया. आपल्यातील शत्रुत्वाला दूर फेकून प्रगतीच्या मार्गाने पुढे जाणाऱ्या यज्ञकर्त्यांच्या जवळ जाऊया. ॥५ ॥

एता धियं कृणवामा सखायोऽप या माताँ ऋणुत व्रजं गोः ।
यया मनुर्विशिशिप्रं जिगाय यया वणिग्वङ्कुरापा पुरीषम् ॥६॥
हे मित्रांनो ! आपण सर्व मिळून श्रेष्ठ बुद्धी प्राप्त करूया. या बुद्धीनेच गायींचा गोठा (ज्ञानाचा मार्ग) उघडला जातो. या बुद्धीच्या बळावर मनूने विद्रूप चेहऱ्याच्या राक्षसावर (विशिशिप्रम्) विजय मिळवला आणि या बुद्धीच्या सहाय्याने गतिशील व्यापाऱ्याने विपुल समृद्धी प्राप्त केली. ॥६ ॥

अनूनोदत्र हस्तयतो अद्रिरार्चन्येन दश मासो नवग्वाः ।
ऋतं यती सरमा गा अविन्दद्विश्वानि सत्याङ्गिराश्चकार॥७॥
हाताने चालविलेल्या वज्राने पर्वतावर प्रहार करून प्रचंड गर्जना करणाऱ्या इंद्रदेवांची नवग्व आणि दशग्व यज्ञ करणाऱ्या ऋषींनी पूजा अर्चना केली. सत्याच्या मार्गावर चालणाऱ्या देवांच्या कुत्रीने 'सरमाने' गायींचा शोध लावला आणि आङ्गिरस ऋषींनी आपल्या सत्कर्मांनी सर्व गोष्टी सत्य करून दाखवल्या. ॥७ ॥

विश्वे अस्या व्युषि माहिनायाः सं यद्गोभिरङ्गिरसो नवन्त ।
उत्स आसां परमे सधस्थ ऋतस्य पथा सरमा विदद्गाः॥८॥
या महान उषादेवतेच्या दिव्य प्रकाशामध्ये, जेव्हा आङ्गिरस ऋषी गायींच्या प्राप्तीसाठी एकत्र येऊन आनंदात गर्जना करत स्तुती करू लागले, तेव्हा सत्याच्या मार्गाने चालणाऱ्या सरमाने त्या गायींच्या सर्वोच्च, गुप्त स्थानाचा शोध लावला आणि त्या गायींना शोधून दिले. ॥८ ॥

आ सूर्यो यातु सप्ताश्वः क्षेत्रं यदस्योर्विया दीर्घयाथे ।
रघुः श्येनः पतयदन्धो अच्छा युवा कविर्दीदयद्गोषु गच्छन्॥९॥
सात अश्व जोडलेल्या रथात आरुढ होऊन सूर्यदेव आपल्या विस्तीर्ण आणि लांब अंतराळातील मार्गावर प्रवासासाठी येवोत. श्येन पक्ष्याप्रमाणे अत्यंत वेगवान असणारे, नित्यतरुण आणि सर्वज्ञ असणारे सूर्यदेव आपल्या प्रकाशमान किरणांसह पृथ्वीकडे वेगाने मार्गक्रमण करोत.॥९॥.

आ सूर्यो अरुहच्छुक्रमर्णोऽयुक्त यद्धरितो वीतपृष्ठाः ।
उद्ना न नावमनयन्त धीरा आशृण्वतीरापो अर्वागतिष्ठन् ॥१० ॥

तेजस्वी सूर्यदेव प्रकाशमान अशा जलमय अंतरिक्षात उगवले आहेत. सूर्यदेवांनी आपल्या चमकदार, हिरवट-पिवळसर रंगाच्या (हरित) अश्वांना रथाला जोडले आहे. ज्याप्रमाणे बुद्धिमान नावाडी पाण्यावर नौका पुढे नेतात, त्याप्रमाणे सूर्यदेवांची आज्ञा ऐकून नद्यांचे पाणी पृथ्वीवर वेगाने वाहू लागले आहे ॥१० ॥

धियं वो अप्सु दधिषे स्वर्षां ययातरन्दश मासो नवग्वाः ।
अया धिया स्याम देवगोपा अया धिया तुतुर्यामात्यंहः॥११॥
प्रकाश देणाऱ्या बुद्धीच्या साहाय्याने 'नवग्व' ऋषींनी दहा महिन्यांचे दीर्घ यज्ञ पार केले, ती सुखदायिनी बुद्धी आम्ही भक्तगण देवतांच्या प्राणांमध्ये प्रस्थापित करतो. या दिव्य बुद्धीच्या बळावर आम्हा भक्तगणांना देवतांचे संरक्षण लाभावे आणि तिच्याच साहाय्याने आम्ही सर्व पाप आणि संकटांना पार करून जावे ही इच्छा .॥११ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-४६

ऋषि- प्रतिक्षत्र आत्रेय **देवता** – विश्वेदेवा७,८ देवपत्नि **छन्द** जगती२,८ त्रिष्टुप्

हयो न विद्वाँ अयुजि स्वयं धुरि तां वहामि प्रतरणीमवस्युवम् ।
नास्या वश्मि विमुचं नावृतं पुनर्विद्वान्पथः पुरएत ऋजु नेषति॥१॥
प्रतिक्षत्र आत्रेय ऋषी म्हणतात, "एका ज्ञानी आणि चपळ अश्वाप्रमाणे मी स्वतःला या संकटांतून तारून नेणाऱ्या आणि कल्याण करणाऱ्या रथाच्या धुरेला स्वतःहून जुंपून घेतले आहे, आणि मी ती धुरा वाहून नेत आहे. आता या कर्तव्यापासून मुक्त होण्याची माझी अजिबात इच्छा नाही. कारण आमचा मार्गदर्शक असलेला तो सर्वज्ञ परमेश्वर आम्हाला सन्मार्गाने पुढे घेऊन जाईल."॥१॥

अग्न इन्द्र वरुण मित्र देवाः शर्धः प्र यन्त मारुतोत विष्णो ।
उभा नासत्या रुद्रो अध ग्नाः पूषा भगः सरस्वती जुषन्त ॥२॥
हे इंद्रदेवा, अग्निदेवा, वरुणदेवा आणि मित्रदेवा ! आपण सर्व जण आम्हा भक्तगणांना शक्ती द्यावी ही विनंती. हे मरुद्गण आणि विष्णुदेवा ! आपण सुद्धा आम्हाला शक्ती द्यावी ही विनंती. हे अश्विनीकुमार, रुद्रदेव, सर्व देवांच्या पत्नी, पूषन्, भगदेवा आणि सरस्वतीदेवी ! आपण आम्हा भक्तगणांची स्तुती स्वीकारावी ही विनंती.॥२ ॥

इन्द्राग्नी मित्रावरुणादितिं स्वः पृथिवीं द्यां मरुतः पर्वताँ अपः ।
हुवे विष्णुं पूषणं ब्रह्मणस्पतिं भगं नु शंसं सवितारमूतये ॥३ ॥

आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आमच्या रक्षणासाठी इंद्रदेव, अग्निदेव , मित्रदेव, वरुणदेव , देवमाता अदिती, स्वर्गलोक, पृथ्वीलोक , आकाशलोक , मरुद्गण, पर्वत आणि जल देवतांना आवाहन करतो. तसेच आम्ही यज्ञकर्ते भक्तगण विष्णूदेव , पूषन् देव, ब्रह्मणस्पती, भगदेव आणि सर्वांना प्रेरित करणाऱ्या स्तुतिपात्र सविता देवांना मनोभावे आवाहन करतो. ॥३ ॥

उत नो विष्णुरुत वातो अस्रिधो द्रविणोदा उत सोमो मयस्करत् ।
उत ऋभव उत राये नो अश्विनोत त्वष्टोत विभ्वानु मंसते ॥४ ॥
विष्णुदेव, वायुदेव आम्हा भक्तगणांना सुख प्रदान करोत. धन प्रदान करणारे द्रविणोदा आणि सोमदेव आम्हांला आनंद देवोत. तसेच ऋभुदेव, अश्विनीकुमार, त्वष्टदेव आणि विभ्वादेव आम्हा भक्तगणांना धन-ऐश्वर्य देण्यासाठी आमच्यावर अनुग्रह करोत . ॥४ ॥

उत त्यन्नो मारुतं शर्ध आ गमद्दिविक्षयं यजतं बर्हिरासदे ।
बृहस्पतिः शर्म पूषोत नो यमद्वरूथ्यं वरुणो मित्रो अर्यमा ॥५॥
स्वर्गात निवास करणारे, पूजनीय आणि प्रसिद्ध मरुद्गण आपल्या सामर्थ्यासह यज्ञातील कुशाच्या आसनावर विराजमान होण्यासाठी आमच्याकडे येवोत. तसेच बृहस्पती, पूषन् देव, वरुणदेव, मित्रदेव आणि अर्यमा देवता आम्हा भक्तगणांना श्रेष्ठ, संकटांपासून दूर ठेवणारे सुख आणि विस्तीर्ण रक्षण प्रदान करोत ही विनंती. ॥५ ॥

उत त्ये नः पर्वतासः सुशस्तयः सुदीतयो नद्यस्त्रामणे भुवन् ।
भगो विभक्ता शवसावसा गमदुरुव्यचा अदितिः श्रोतु मे हवम् ॥६॥

स्तुतीस पात्र असलेले पर्वत आणि दैदीप्यमान नद्या आम्हा भक्तगणांचे रक्षण करोत ही विनंती. ऐश्वर्याचे वाटप करणारे भगदेव आमच्या रक्षणासाठी येथे येवोत. सर्वव्यापी अदितीमाता आम्हा भक्तगणांच्या प्रार्थना श्रवण करोत ही विनंती. ॥६ ॥

देवानां पत्नीरुशतीरवन्तु नः प्रावन्तु नस्तुजये वाजसातये ।
याः पार्थिवासो या अपामपि व्रते ता नो देवीः सुहवाः शर्म यच्छत॥७॥

आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांवर प्रेम करणाऱ्या देवांच्या पत्नी आमचे रक्षण, संततीची वृद्धी करण्यासाठी आणि समृद्धी मिळवून देण्यासाठी आम्हाला सहाय्य करोत ही विनंती. पृथ्वीलोकात विद्यमान असलेल्या, जलतत्त्वावर नियंत्रण ठेवणाऱ्या, आम्हा भक्तगणांच्या हाकेला धावून येणाऱ्या देवता आम्हाला सुख प्रदान करोत ही विनंती ॥७ ॥

उत ग्ना व्यन्तु देवपत्नीरिन्द्राण्यग्नाय्यश्विनी राट् ।
आ रोदसी वरुणानी शृणोतु व्यन्तु देवीर्य ऋतुर्जनीनाम् ॥८ ॥

देवपत्नी आणि दिव्यस्त्रिया (ग्ना) यज्ञामध्ये येऊन हविष्यान्नाचा स्वीकार करोत. इंद्रदेवाची पत्नी सम्राज्ञी इन्द्राणी, अग्निदेवांची पत्नी अग्नायी आणि अश्विनीकुमारांची पत्नी अश्विनीदेवी आमच्यावर प्रसन्न होवोत. स्वर्ग आणि पृथ्वी तसेच वरुणदेवांची पत्नी वरुणानी आमचे आवाहन ऐको. ज्या देवीमाता उत्पत्तीच्या आणि यज्ञाच्या योग्य काळाचे नियंत्रण करतात, त्या सर्व देवता येथे येऊन हविष्यान्नाचा स्वीकार करोत ॥८ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-४७

ऋषि- प्रतिरथ आत्रेय **देवता** – विश्वेदेवा **छन्द** त्रिष्टुप्

प्रयुञ्जती दिव एति ब्रुवाणा मही माता दुहितुर्बोधयन्ती ।
आविवासन्ती युवतिर्मनीषा पितृभ्य आ सदने जोहुवाना ॥१॥
कार्यरत असणारी, नवयौवना, पूजनीय, प्रबोधन करणारी उषादेवता स्वर्गलोकातून, एखादी माता कन्येला ज्ञान देते त्याप्रमाणे प्रमाणे यज्ञगृहात ज्ञान देण्यासाठी देण्यासाठी प्रकट होते. उषादेवता आपल्या यज्ञगृहात बसून सर्व पूर्वजांना आणि देवांना आवाहन करत आहे. ॥१॥

अजिरासस्तदप ईयमाना आतस्थिवांसो अमृतस्य नाभिम् ।
अनन्तास उरवो विश्वतः सीं परि द्यावापृथिवी यन्ति पन्थाः ॥२ ॥
कधीही न थकणारे, वेगाने वाहणारे जल, न संपणाऱ्या ऊर्जेचा आश्रय घेते. त्याचे विशाल आणि सर्व बाजूंना व्यापणारे मार्ग आकाश आणि पृथ्वीला चहूबाजूंनी वेढून टाकतात. ॥२ ॥.

उक्षा समुद्रो अरुषः सुपर्णः पूर्वस्य योनिं पितुरा विवेश ।
मध्ये दिवो निहितः पृश्निरश्मा वि चक्रमे रजसस्पात्यन्तौ ॥३॥
सिंचन करणारे, प्रकाशाचे महासागर, लाल रंगाचे आणि सुंदर पंख असलेले सूर्यदेव आपल्या पूर्वेकडील पित्याच्या (आकाशाच्या) मूळस्थानामध्ये प्रवेश करतात . आकाशाच्या मध्यभागी स्थापित, रंगीबेरंगी पाषाणासारखा तेजस्वी सूर्यदेव संपूर्ण लोकांचे रक्षण करत, दोन्ही पूर्व आणि पश्चिम क्षितिजांच्या टोकांपर्यंत आपले पाऊल टाकत पुढे मार्गक्रमण करतात. ॥३ ॥.

चत्वार ईं बिभ्रति क्षेमयन्तो दश गर्भं चरसे धापयन्ते ।
त्रिधातवः परमा अस्य गावो दिवश्चरन्ति परि सद्यो अन्तान् ॥४ ॥
जगाचे कल्याण इच्छिणारे चार रक्षक या विश्वाचे पोषण करतात . दहा दिशा विश्वाच्या अंतर्गत गर्भाला गती देण्यासाठी त्याचे पोषण करतात. या सूर्यदेवांचे तीन घटकांनी ('त्रिधातवः)बनलेले श्रेष्ठ किरण आकाशाच्या सर्व सीमांपर्यंत एकाच वेळी चहूबाजूंनी संचार करतात ॥४ ॥
निसर्गाचे चार मुख्य ऋतू वसंत .ग्रीष्म.वर्षा शरद चार ऋतू चक्राकार गतीने वेळेवर आले नाही तर संपूर्ण सजीव सृष्टीचा (मानव, प्राणी, वनस्पती) विनाश होईल
दहा दिशा चार मुख्य दिशा पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण. चार उपदिशाआग्नेय, ईशान्य, वायव्य, नैऋत्य. दोन इतर दिशा: ऊर्ध्व आणि अधर
तीन घटक अग्नि वायू आणि जल

इदं वपुर्निवचनं जनासश्चरन्ति यन्नद्यस्तस्थुरापः ।
द्वे यदीं बिभृतो मातुरन्ये इहेह जाते यम्या सबन्धू ॥५ ॥
जलाचे रूप खरोखरच एक महान रहस्य आहे. जलाच्या गतीमध्ये मनुष्य आपले जीवन व्यतीत करतात. नद्यांचे पाणी वाहत असले तरी तरी नद्या स्थिर राहतात असे वाटते. दोन्ही पृथ्वी आणि आकाश जलाचे पोषण करतात. वेगवेगळ्या ठिकाणी जन्मलेल्या या नद्या जुळ्या बहिणींप्रमाणे सतत प्रवाहित असतात.॥५ ॥

वि तन्वते धियो अस्मा अपांसि वस्त्रा पुत्राय मातरो वयन्ति ।
उपप्रक्षे वृषणो मोदमाना दिवस्पथा वध्वो यन्त्यच्छ ॥६ ॥

एकत्र राहणाऱ्या माता रात्रदेवता आणि उषादेवता आपल्या पुत्रासाठी, सूर्यदेवांसाठी, यज्ञकर्मे सुरू करतात आणि प्रकाशाची वस्त्रे विणतात. आनंदित झालेले, वर्षाव करणारे मेघ अंतराळात एकत्र येतात आणि वधूप्रमाणे आकाशाच्या मार्गाने सूर्यदेवांकडे जातात ॥६ ॥

तदस्तु मित्रावरुणा तदग्ने शं योरस्मभ्यमिदमस्तु शस्तम् ।
अशीमहि गाधमुत प्रतिष्ठां नमो दिवे बृहते सादनाय ॥७ ॥
हे मित्रदेवा, वरुणदेवा, अग्निदेवा! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांची ही स्तोत्रे आपण स्वीकारावीत ही विनंती. आमच्या या स्तोत्रांमुळे आम्ही रोग आणि भयमुक्त होऊ . आम्हाला जीवनात सुरक्षित आश्रय आणि प्रतिष्ठा लाभो ही विनंती. आकाशात निवासस्थान असणाऱ्या सूर्यदेवांना आमचा आदरपूर्वक नमस्कार आहे . ॥७ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-४८

ऋषि- प्रतिभानु आत्रेय **देवता** – विश्वेदेवा **छन्द** जगती

कदु प्रियाय धाम्ने मनामहे स्वक्षत्राय स्वयशसे महे वयम् ।
आमेन्यस्य रजसो यदभ्र आँ अपो वृणाना वितनोति मायिनी॥१॥

त्या महान, स्वतःचे साम्राज्य असलेल्या आणि स्वतःच्या तेजाने चमकणाऱ्या देवतेचे आम्ही भक्तगण, प्रसन्न करण्यासाठी आणि अन्न मिळवण्यासाठी मनोभावे पूजन करतो. ती शक्ती आकाशात सर्वत्र पसरून, आपल्या अद्भुत कौशल्याने पाण्याची निर्मिती करते आणि मेघांना सर्व बाजूंनी व्यापून टाकते. ॥१॥

ता अत्नत वयुनं वीरवक्षणं समान्या वृतया विश्वमा रजः ।
अपो अपाचीरपरा अपेजते प्र पूर्वाभिस्तिरते देवयुर्जनः ॥२ ॥

सर्वव्यापी, सामर्थ्यशाली आणि प्रकाशमान ईश्वरीशक्ती एकाच निश्चित नियमाने या संपूर्ण विश्वाला व्यापून टाकते. ती शक्ती अज्ञानाचा अंधार दूर करते. जो देवभक्त भक्तगण देवांवर श्रद्धा ठेवतो तो आपल्या चांगल्या कर्मांच्या साहाय्याने आयुष्यात सातत्याने पुढे प्रगती करत राहतो. ॥२ ॥

आ ग्रावभिरहन्येभिरक्तुभिर्वरिषं वज्रमा जिघर्ति मायिनि ।
शतं वा यस्य प्रचरन्त्स्वे दमे संवर्तयन्तो वि च वर्तयन्नहा ॥३ ॥

इंद्रदेव दिवसा आणि रात्री सोमरसाचा अभिषेक करणाऱ्या, पाषाणांच्या सहाय्याने मायावी शत्रूचा नाश करण्यासाठी आपल्या अत्यंत श्रेष्ठ अशा वज्राला धारदार करतात. इंद्रदेवाच्या निवासस्थानात

दिवसाला संपवणारे आणि नव्या दिवसाची सुरुवात करणारे शेकडो देव संचार करत असतात.॥३ ॥

तामस्य रीतिं परशोरिव प्रत्यनीकमख्यं भुजे अस्य वर्पसः ।
सचा यदि पितुमन्तमिव क्षयं रत्नं दधाति भरहूतये विशे ॥४ ॥
आम्ही यज्ञकर्ते भक्तगण अग्निदेवांच्या कुऱ्हाडीच्या धारेप्रमाणे दैदिप्यमान ज्वालांच्या समूहाला पाहत आहोत. मित्रत्वाच्या भावनेने अग्निदेव यज्ञकर्त्या भक्तगणांना अन्नधान्यांनी समृद्ध निवासस्थान प्रदान करतात. ॥४ ॥

स जिह्वया चतुरनीक ऋञ्जते चारु वसानो वरुणो यतन्नरिम् ।
न तस्य विद्म पुरुषत्वता वयं यतो भगः सविता दाति वार्यम् ॥५ ॥
श्रेष्ठ अग्निदेव आपल्या ज्वालारूपी जिभेने चारी दिशांना प्रदीप्त होत, तेजाचे वस्त्र परिधान करत मार्गक्रमण करतात आणि शत्रुवर नियंत्रण ठेवतात. हे सूर्यदेवा ! आपण आम्हा भक्तगणांना ऐश्वर्य प्रदान करता त्यांचे आम्ही भक्तगण आमच्या मर्यादित बुद्धीने पूर्ण सामर्थ्य समजू शकत नाही. ॥५ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-४९

ऋषि- प्रतिप्रभ आत्रेय **देवता** – विश्वेदेवा **छन्द** त्रिष्टुप्

देवं वो अद्य सवितारमेषे भगं च रत्नं विभजन्तमायोः ।
आ वां नरा पुरुभुजा ववृत्यां दिवेदिवे चिदश्विना सखीयन् ॥१॥
प्रतिप्रभ आत्रेयऋषि म्हणतात, " हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो तुमच्या साठी ऐश्वर्य, सौभाग्य आणि मौल्यवान रत्नांचे वाटप करणाऱ्या त्या प्रकाशमान सूर्यदेवांची मी प्रार्थना करतो. हे सर्वांचे रक्षण करणाऱ्या अश्विनीकुमारांनो, मी आपले सख्य मिळवण्यासाठी दररोज तुम्हाला आवाहन करत आहे" . ॥१॥

प्रति प्रयाणमसुरस्य विद्वान्त्सूक्तैर्देवं सवितारं दुवस्य ।
उप ब्रुवीत नमसा विजानञ्ज्येष्ठं च रत्नं विभजन्तमायोः ॥२॥
हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! प्रत्येक कार्याची सुरुवात करताना पवित्र स्तोत्रांद्वारे सूर्यदेवांची सेवा करावी कारण सूर्यदेव मानवाच्या कल्याणासाठी श्रेष्ठ आणि मौल्यवान सुख-समृद्धीचे वाटप करतात॥२ ॥

अदत्रया दयते वार्याणि पूषा भगो अदितिर्वस्त उस्रः ।
इन्द्रो विष्णुर्वरुणो मित्रो अग्निरहानि भद्रा जनयन्त दस्माः ॥३॥
कधीही न संपणाऱ्या दानाने पूषन् देव आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना स्वीकारण्यायोग्य श्रेष्ठधन प्रदान करतात. भगदेव, माता अदिती आणि तेजस्वी उषादेवता आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना समृद्धीच्या व प्रकाशाच्या वस्त्रांनी वेढून घेतात. अत्यंत प्रतापी आणि अद्भुत शक्ती

असणारे इंद्रदेव , विष्णुदेव , वरुणदेव , मित्रदेव आणि अग्निदेव सर्वांसाठी कल्याणकारी अन् मंगलमय दिवसांची निर्मिती करतात॥३॥

तन्नो अनर्वा सविता वरूथं तत्सिन्धव इषयन्तो अनु ग्मन् ।
उप यद्वोचे अध्वरस्य होता रायः स्याम पतयो वाजरत्नाः ॥४॥
ज्याला कोणी शत्रू नाही असे सवितादेव आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना उत्तम आणि अभेद्य संरक्षण देवोत ही विनंती. जीवनदान देणाऱ्या नद्या (सिन्धवः) सविता देवांच्या या कार्यात अनुकूल आणि सोबती बनोत. आम्ही यज्ञकर्त्या भक्तगणांनी केलेली प्रार्थना पूर्ण होऊन आम्हाला अन्न, संपत्ती आणि ऐश्वर्य मिळावे ही इच्छा . ॥४ ॥

प्र ये वसुभ्य ईवदा नमो दुर्ये मित्रे वरुणे सूक्तवाचः ।
अवैत्वभ्वं कृणुता वरीयो दिवस्पृथिव्योरवसा मदेम ॥५ ॥
यज्ञवेदीमध्ये ज्या यज्ञकर्त्या भक्तगणांनी योग्यरीत्या नतमस्तक होऊन वसुदेवांसाठी स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण केले त्यांच्या आयुष्यातील सर्व संकटे दूर होवोत ही विनंती. हे वसुदेवांनो आपण आमच्यासाठी सुखकारक मार्ग तयार करावा जेणेकरून आम्हा भक्तगणांना पृथ्वी आणि आकाशाचे संरक्षण मिळेल.॥५ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-५०

ऋषि- स्वस्ति आत्रेय **देवता** – विश्वेदेवा **छन्द** अनुष्टुप् ५ पंक्ति

विश्वो देवस्य नेतुर्मर्तो वुरीत सख्यम् ।
विश्वो राय इषुध्यति द्युम्नं वृणीत पुष्यसे ॥१॥

प्रत्येक मर्त्य मानवाने मार्गदर्शक सवितादेवांशी सख्य जोडले पाहिजे. प्रत्येक जण सवितादेवांकडे समृद्धीची मागणी करतो परंतु मर्त्य मानवाने ज्यामुळे त्याचे जीवन समृद्ध होईल अशा श्रेष्ठ धनाचा स्वीकार करावा. ॥१॥

ते ते देव नेतर्ये चेमाँ अनुशसे ।
ते राया ते ह्यापृचे सचेमहि सचथ्यैः॥२॥

मार्गदर्शन करणारे दिव्य सवितादेव आम्हा भक्तगणांना सुशासनात ठेवतात. आम्ही भक्तगण सवितादेवांच्या कल्याणकारी संगतीने समृद्धी आणि ऐश्वर्य निश्चितच प्राप्त करू. ॥२ ॥

अतो न आ नृनतिथीनतः पत्नीर्दशस्यत ।
आरे विश्वं पथेष्ठां द्विषो युयोतु यूयुविः ॥३ ॥

...म्हणूनच आम्ही यज्ञकर्ते येणाऱ्या श्रेष्ठ अतिथींचा आणि त्यांच्या पत्नीचा योग्य आदर सत्कार करतो. (परमेश्वराच्या कृपेने) आम्हा भक्तगणांच्या प्रगतीच्या मार्गात बाधा आणणारे आणि द्वेष करणारे आमच्यापासून दूर निघून जावोत. ॥३ ॥

यत्र वह्निरभिहितो दुद्रवद्द्रोण्यः पशुः ।
नृमणा वीरपस्त्योऽर्णा धीरेव सनिता॥४ ॥

जेथे अग्निदेवांना प्रदीप्त केले जाते, तिथे अग्निदेव एखाद्या मुक्त केलेल्या पशु सारखे वेगाने लाकडी पात्राकडे धाव घेतात. अग्निदेव मानवांचे कल्याण करणारे, पराक्रमी पुरुषांच्या घरांचे रक्षण करणारे, पाण्याच्या प्रवाहासारखे गतिमान आणि एखाद्या बुद्धिमान पुरुषाप्रमाणे यज्ञाचे फळ प्रदान करणारे आहेत. ॥४ ॥

एष ते देव नेता रथस्पतिः शं रयिः ।
शं राये शं स्वस्तय इषःस्तुतो मनामहे देवस्तुतो मनामहे॥५ ॥
हे दिव्य सवितादेवा ! आम्हा भक्तगणांसाठी आपण मार्गदर्शक, रथाचे स्वामी, सुखकारक आणि संपत्ती देणारे आहात. आम्ही भक्तगण आमच्या कल्याणासाठी, समृद्धीसाठी आणि अन्नाच्या प्राप्तीसाठी, देवतांनी स्तुती केलेल्या त्या सवितादेवांचे मनात चिंतन करतो आणि प्रार्थना करतो. ॥५ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-५१

ऋषि- स्वस्ति आत्रेय **देवता** – विश्वेदेवा

छन्द १-४ गायत्री, ५-१० उष्णिक ; ११-१३ जगती १४-१५ अनुष्टुप्

अग्ने सुतस्य पीतये विश्वैरूमेभिरा गहि । देवेभिर्हव्यदातये ॥१॥
हे अग्निदेवा ! सिद्ध केलेल्या सोमरसाचे प्राशन करण्यासाठी आणि यज्ञातील हविष्यान्नाची आहुती स्वीकारण्यासाठी आपण रक्षण करणाऱ्या आपल्या सर्व देवगणांसह आणि सोबत्यांसह आमच्या यज्ञस्थळी आगमन करावे ही विनंती ॥१॥

ऋतधीतय आ गत सत्यधर्माणो अध्वरम् ।
अग्नेः पिबत जिह्वया ॥२ ॥
हे सत्य बुद्धीने चिंतन करणाऱ्या आणि सत्याचेच आचरण करणाऱ्या देवतांनो! आपण या पवित्र यज्ञाच्या ठिकाणी यावे आणि अग्निदेवांच्या जिभेने सोमरस प्राशन करावा ही विनंती. ॥२॥

विप्रेभिर्विप्र सन्त्य प्रातर्यावभिरा गहि । देवेभिः सोमपीतये ॥३ ॥
हे बुद्धिमान कल्याणकारी मेधावी (अग्निदेवा)! पहाटेच्या वेळी इतर प्रकाशमान देवतांसह आपण सोमरस प्राशन करण्यासाठी आमच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती. ॥३ ॥

अयं सोमश्चमू सुतोऽमत्रे परि षिच्यते । प्रिय इन्द्राय वायवे ॥४॥
इंद्रदेवांना आणि वायुदेवांना अत्यंत प्रिय असलेला हा सिद्ध केलेला सोमरस यज्ञपात्रांमध्ये आणि मोठ्या कलशामध्ये ओतला जात आहे. ॥४ ॥

वायवा याहि वीतये जुषाणो हव्यदातये ।
पिबा सुतस्यान्धसो अभि प्रयः ॥५॥
हे वायुदेवा !आपण प्रसन्न होऊन आम्ही भक्तगणांनी अर्पण केलेल्या हविष्यान्नाच्या आहुतीचा आणि सिद्ध केलेला सोमरस प्राशन करण्यासाठी यावे ही विनंती. ॥५ ॥

इन्द्रश्च वायवेषां सुतानां पीतिमर्हथः ।
ताञ्जुषेथामरेपसावभि प्रयः ॥६॥
हे निष्पाप इंद्रदेवा आणि वायुदेवा ! आपण दोघे सिद्ध केलेल्या सोमरसाचे पान करण्यास पूर्णपणे योग्य आहात. आमच्या यज्ञातील हविष्यान्नाच्या आहुती स्वीकार करून सोमरस प्राशनाचा आनंदपूर्वक उपभोग घ्यावा ही विनंती. ॥६ ॥

सुता इन्द्राय वायवे सोमासो दध्याशिरः ।
निम्नं न यन्ति सिन्धवोऽभि प्रयः ॥७ ॥
ज्याप्रमाणे नद्या अत्यंत वेगाने उताराच्या दिशेने वाहतात, त्याचप्रमाणे दह्यामध्ये चांगल्या प्रकारे सिद्ध केलेला सोमरस इंद्रदेवांना आणि वायुदेवांना तृप्त करण्यासाठी त्यांच्याकडे वेगाने जात आहे.॥७॥

सजूर्विश्वेभिर्देवेभिरश्विभ्यामुषसा सजूः ।
आ याह्यग्ने अत्रिवत्सुते रण ॥८ ॥
हे अग्निदेवा ! आपण सर्व देवांसह, दोन्ही अश्विनीकुमारांसह आणि उषादेवतेसह एकत्रित होऊन आमच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती. आपण ज्याप्रमाणे अत्रीऋषींवर प्रसन्न होऊन त्यांच्या यज्ञाला आला

होतात, त्याचप्रमाणे हा सिद्ध केलेला सोमरस स्वीकारून आनंदित व्हावे ही विनंती. ॥८॥

सजूर्मित्रावरुणाभ्यां सजूः सोमेन विष्णुना ।
आ याह्यग्ने अत्रिवत्सुते रण ॥९ ॥
हे अग्निदेवा ! आपण मित्रदेव, वरुणदेव, सोमदेव आणि विष्णुदेव या सर्व देवांसोबत आमच्या यज्ञस्थळी येऊन, ज्याप्रमाणे पूर्वी आपण अत्रीऋषींच्या यज्ञाला जाऊन प्रसन्न झाला होता त्याप्रमाणे आम्ही भक्तगणांनी सिद्ध केलेला सोमरस प्राशन करून प्रसन्न व्हावे ही विनंती ॥९ ॥

सजूरादित्यैर्वसुभिः सजूरिन्द्रेण वायुना ।
आ याह्यग्ने अत्रिवत्सुते रण ॥१० ॥
हे अग्निदेवा! आपण आदित्यदेव ,सर्व वसु, इंद्रदेव आणि वायुदेव या सर्व देवांसोबत आमच्या यज्ञस्थळी येऊन, ज्याप्रमाणे पूर्वी आपण अत्रीऋषींच्या यज्ञाला जाऊन प्रसन्न झाला होता त्याप्रमाणे आम्ही भक्तगणांनी सिद्ध केलेला सोमरस प्राशन करून प्रसन्न व्हावे ही विनंती ॥१० ॥

स्वस्ति नो मिमीतामश्विना भगः स्वस्ति देव्यदितिरनर्वणः ।
स्वस्ति पूषा असुरो दधातु नः स्वस्ति द्यावापृथिवी
सुचेतुना॥११॥
दोन्ही अश्विनीकुमार आणि भगदेव आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे कल्याण करोत. ज्यांचा कोणी शत्रू नाही अशा अदितीदेवी आमचे मंगल करोत. शक्तिशाली आणि पोषणकर्ते पूषन् देव आम्हाला सुख-

समृद्धी देवोत. तसेच, आकाश आणि पृथ्वी आपल्या श्रेष्ठ बुद्धीने आणि कृपेने आमचे कल्याण करोत . ॥११ ॥

स्वस्तये वायुमुप ब्रवामहै सोमं स्वस्ति भुवनस्य यस्पतिः ।
बृहस्पतिं सर्वगणं स्वस्तये स्वस्तय आदित्यासो भवन्तु नः ॥१२ ॥

आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आमच्या कल्याणासाठी वायुदेवांची प्रार्थना करतो. या संपूर्ण विश्वाचा जो स्वामी आणि रक्षक आहे, त्या सोमदेवांना आम्ही कल्याणासाठी आळवतो. आपल्या सर्व गणांसह असणाऱ्या बृहस्पतीदेवांना आम्ही कल्याणासाठी शरण जातो. सूर्यदेव आमच्यासाठी कल्याणकारी होवोत ही विनंती. ॥१२ ॥

विश्वे देवा नो अद्या स्वस्तये वैश्वानरो वसुरग्निः स्वस्तये ।
देवा अवन्त्वृभवः स्वस्तये स्वस्ति नो रुद्रः पात्वंहसः ॥१३ ॥

सर्व देवता आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे कल्याण करोत. सर्वांना आश्रय देणारे वैश्वानर अग्निदेव आमचे कल्याण करोत. ऋभूदेव आमचे रक्षण करोत. रुद्रदेव आम्हांला सर्व प्रकारच्या संकटांपासून आमचे रक्षण करून कल्याण करोत ही विनंती. ॥१३ ॥

स्वस्ति मित्रावरुणा स्वस्ति पथ्ये रेवति ।
स्वस्ति न इन्द्रश्चाग्निश्च स्वस्ति नो अदिते कृधि ॥१४ ॥

मित्रदेव आणि वरुणदेव आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे कल्याण करोत. मार्गाची आणि समृद्धीची देवी (पथ्या रेवती) आमचे मंगल करो. इंद्रदेव आणि अग्निदेव आमचे कल्याण करोत. हे देवमाता अदिती! आपण देखील आमचे कल्याण करावे ही विनंती. ॥१४ ॥.

स्वस्ति पन्थामनु चरेम सूर्याचन्द्रमसाविव । पुनर्ददताघ्नता जानता सं गमेमहि ॥१५ ॥

ज्याप्रमाणे सूर्य आणि चंद्र नेहमी कल्याणकारी मार्गावरून प्रवास करतात, त्याचप्रमाणे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण सुद्धा नेहमी कल्याणाच्या आणि सत्याच्या मार्गावर प्रवास करत राहू. तसेच, पुन्हा-पुन्हा दान देणाऱ्या परोपकारी, कधीही हिंसा न करणाऱ्या आणि सत्याचे ज्ञान असणाऱ्या लोकांची आम्हांला सोबत कायम लाभो आणि आम्ही त्यांच्या सान्निध्यात राहू ॥१५॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-५२

ऋषि- श्यावाश्व आत्रेय **देवता** – मरुद्गण **छन्द** अनुष्टुप् ; ६, १७ पंक्ति

प्र श्यावाश्व धृष्णुयार्चा मरुद्भिरृक्वभिः । ये अद्रोघमनुष्वधं श्रवो मदन्ति यज्ञियाः ॥१॥

हे श्यावाश्व ऋषि ! आपण धैर्याने आणि उत्तम प्रकारे स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण करणाऱ्या भक्तगणांसह मरुद्गणांची स्तुती करावी . यज्ञास पात्र, निष्कपट, आपल्या स्वभावानुसार आनंद देणारे मरुद्गण हविष्यान्नाच्या आहुतीने प्रसन्न होतात. ॥१॥

ते हि स्थिरस्य शवसः सखायः सन्ति धृष्णुया । ते यामन्ना धृषद्विनस्त्मना पान्ति शश्वतः ॥२ ॥

मरुद्गण खरोखरच दृढ आणि महान शक्तीचे धैर्याने युक्त असे सखा आहेत. ते साहसी वीर आपल्या प्रवासात आपल्या स्वतःच्या सामर्थ्याने सर्व अनुयायांचे निरंतर रक्षण करतात. ॥२ ॥

ते स्यन्द्रासो नोक्षणोऽति ष्कन्दन्ति शर्वरीः । मरुतामधा महो दिवि क्षमा च मन्महे ॥३ ॥

वेगाने धावणाऱ्या बलवान बैलांप्रमाणे, मरुद्गण अंधकारमय रात्रींना वेगाने ओलांडून पुढे जातात, म्हणून मरुद्गणांच्या आकाशातील आणि पृथ्वीवरील सामर्थ्याचे आम्ही भक्तगण स्तुती करतो. ॥३ ॥

मरुत्सु वो दधीमहि स्तोमं यज्ञं च धृष्णुया । विश्वे ये मानुषा युगा पान्ति मर्त्यं रिषः ॥४ ॥

मरुद्गण, यज्ञकर्त्या भक्तगणांच्या जीवनातील सर्व अवस्थांमध्ये हानी आणि हिंसेपासून रक्षण करतात, म्हणून आम्ही भक्तगण त्यांना स्तुतियुक्त स्तोत्रे अर्पण करतो ॥४॥

अर्हन्तो ये सुदानवो नरो असामिशवसः । प्र यज्ञं यज्ञियेभ्यो दिवो अर्चा मरुद्भ्यः ॥५ ॥

हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! पूजनीय, अत्यंत उदार वीर, अथांग शक्तीने युक्त असलेल्या, आकाशातून प्रकट होणाऱ्या, यज्ञास पात्र असलेल्या मरुद्गणांसाठी तुम्ही यज्ञकर्म करून त्यांची स्तुती करावी. ॥५ ॥

आ रुक्मैरा युधा नर ऋष्वा ऋष्टीरसृक्षत ।
अन्वेनाँ अह विद्युतो मरुतो जज्झतीरिव भानुर्रत त्मना दिवः ॥६ ॥

पर्जन्यवृष्टी करणारे मरुद्गण पूर्णपणे चमकदार सुवर्णालंकार आणि शस्त्रास्त्रांनी सज्ज झाले आहेत. त्या महान वीरांनी आपली शस्त्रे उघडली आहेत. आकाशात स्वतःहून प्रकट होणारा त्यांचा दिव्य प्रकाश हा जणू काही आनंदाने खळखळून हसणाऱ्या विजांचा आहे. ॥६ ॥

ये वावृधन्त पार्थिवा य उरावन्तरिक्ष आ । वृजने वा नदीनां सधस्थे वा महो दिवः ॥७ ॥

जे पृथ्वीवर समृद्ध झाले आहेत, जे विशाल अंतराळात पसरले आहेत , जे नद्यांच्या प्रवाहात निवास करतात, असे महान मरुद्गण आकाशलोकातही समृद्ध होवोत. ॥७ ॥

शर्धो मारुतमुच्छंस सत्यशवसमृभ्वसम् । उत स्म ते शुभे नरः प्र स्यन्द्रा युजत त्मना ॥८ ॥

हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो! तुम्ही पराक्रमी मरुद्गणांची स्तुती करा, ज्यांचे सामर्थ्य सत्य आहे, जे दैदिप्यमान आहेत. मरुद्गण स्वतःला सुशोभित करण्यासाठी आपला वेगवान रथ स्वतःहून जोडतात. ॥८ ॥

उत स्म ते परुष्ण्यामूर्णा वसत शुन्ध्यवः । उत पव्या रथानामद्रिं भिन्दन्त्योजसा ॥९ ॥

परुष्णी नदीच्या तीरावर राहणारे ते तेजस्वी मरुद्गण, लोकरीची वस्त्रे परिधान करतात. तसेच, ते आपल्या रथांच्या चाकांच्या धावेने आणि स्वतःच्या अफाट शक्तीने पर्वतांनाही भेदून टाकतात. ॥९ ॥

परुष्णी रावी नदीचे प्राचीन नाव

आपथयो विपथयोऽन्तस्पथा अनुपथाः । एतेभिर्मह्यं नामभिर्यज्ञं विष्टार ओहते ॥१०॥

मुख्य मार्ग, बाजूचा मार्ग, अंतर्गत गुप्त मार्ग आणि मागून येणारे जोडमार्ग; या सर्व वेगवेगळ्या नावांनी आणि स्वरूपांनी हा यज्ञ आम्हा भक्तगणांना समृद्धी देऊन सर्व मार्गांना आपल्या ताब्यात घेतो ॥१० ॥

अधा नरो न्योहतेऽधा नियुत ओहते । अधा पारावता इति चित्रा रूपाणि दर्श्या ॥११॥

सृष्टीचे नेते असणारे हे मरुद्गण संपूर्ण जगाचे पालन पोषण करतात . ते एकमेकांमध्ये संघटित होऊन पुढे सरकतात. अंतरिक्षात अत्यंत

दूरवर राहणाऱ्या ग्रहताऱ्यांना धारण करणाऱ्या मरुद्गणाचे रूप अद्वितीय आणि भव्य आहे. ॥११ ॥

छन्दःस्तुभः कुभन्यव उत्समा कीरिणो नृतुः ।
ते मे के चिन्न तायव ऊमा आसन्दृशि त्विषे ॥१२ ॥
पवित्र छंदामध्ये पठण करणारे पाण्याच्या(ज्ञानाच्या) इच्छेने व्याकुळ असलेले, एखाद्या नर्तकाप्रमाणे थिरकणारे, स्तोत्रांचे पठण करणारे यज्ञकर्ते भक्तगण मरुद्गणांची आळवणी करतात. काही मरुद्गणांनी चोरांप्रमाणे अदृश्य राहूनही भक्तगणांचे रक्षण केले तर काहींनी प्रत्यक्ष प्रकट होऊन आम्हा भक्तगणांच्या शक्तीमध्ये भर घातली. ॥१२ ॥

य ऋष्वा ऋष्टिविद्युतः कवयः सन्ति वेधसः । तमृषे मारुतं गणं नमस्या रमया गिरा ॥१३॥
हे श्यावाश्व ऋषींनो ! जे मरुद्गण महान आहेत, विजेसारख्या चमकणाऱ्या शस्त्रांनी सुसज्ज आहेत, परम ज्ञानी आहेत आणि सृष्टीचे विधाते आहेत अशा मरुद्गणांची आपल्या सुंदर आणि मधुर शब्दांनी स्तुती करावी. ॥१३ ॥

अच्छ ऋषे मारुतं गणं दाना मित्रं न योषणा ।
दिवो वा धृष्णव ओजसा स्तुता धीभिरिषण्यत ॥१४॥
हे ऋषीमुनींनो ! ज्याप्रमाणे एखादी प्रियतमा आपल्या पतीकडे प्रेमाने भेटवस्तू घेऊन जाते, त्याप्रमाणे आपण हविष्यान्नाच्या आहुती आणि उत्तम स्तुतीने मरुद्गणांच्या सन्मुख जावे. हे पराक्रमी मरुद्गणांनो ! आमच्या या पवित्र स्तोत्रांनी आणि बुद्धीने पूजित होऊन, आपण

सामर्थ्यासह अंतराळातून आमच्या या यज्ञात वेगाने प्रगट व्हावे ही विनंती. ॥१४ ॥

नू मन्वान एषां देवाँ अच्छा न वक्षणा । दाना सचेत
सूरिभिर्यामश्रुतेभिरञ्जिभिः ॥१५॥
ज्याप्रमाणे वेगाने वाहणाऱ्या नद्या पाण्याचा प्रवाह (वक्षणाः) वाहून नेतात, त्याप्रमाणेच मरुद्गणांचे स्तुती करणारे ऋषि या यज्ञात प्रसिद्ध, दैदिप्यमान फलदायी म्हणून प्रसिद्ध असलेल्या मरुद्गणांकडून इच्छित दान मिळवू शकतील.॥१५ ॥

प्र ये मे बन्ध्वेषे गां वोचन्त सूरयः पृश्निं वोचन्त मातरम् ।
अधा पितरमिष्मिणं रुद्रं वोचन्त शिक्वसः ॥१६॥
मरुद्गणांना ज्ञानी भक्तगण बंधुत्वाच्या नात्याने पृथ्वीशी घनिष्ठ संबंध असलेल्या पृष्णीला माता म्हणून संबोधतात, तर स्तुती करणारे विद्वान भक्तगण गतिमान आणि इच्छित फळ देणाऱ्या रुद्रदेवांना पिता मानतात. ॥१६ ॥

सप्त मे सप्त शाकिन एकमेका शता ददुः ।
यमुनायामधि श्रुतमुद्राधो गव्यं मृजे नि राधो अश्व्यं मृजे ॥१७ ॥
सात-सातच्या गटात असलेल्या (एकूण ४९) शक्तिशाली मरुद्गणांनी आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना शेकडो गायी आणि अश्व दिले. त्यांनी दिलेले गोधन आणि अश्वधन आम्ही भक्तगणांनी प्रसिद्ध यमुना नदीच्या तीरावर स्वीकारून ऐश्वर्य प्राप्त केले ॥१७ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-५३

ऋषि- श्यावाश्व आत्रेय **देवता** – मरुद्गण

छन्द - ९,५,१०-११, १५ ककुप् ; २ बृहती; ३अनुष्टुप्: ४ पुर उष्णिक् ; ६-७, ९, १३-१४, १६ सतो बृहती; ८,१ २ गायत्री

को वेद जानमेषां को वा पुरा सुम्नेष्वास मरुताम् ।
यद्युयुज्रे किलास्यः ॥१॥

या मरुद्गणांचा जन्म कोणाला बर ज्ञात झाला ? पूर्वी त्यांच्या सुखाच्या क्षणांमध्ये कोण सहभागी झाले होते ? जेव्हा मरुद्गणांनी निश्चयाने ठिपकेदार हरणांना (किलास्यः) आपल्या रथाला जोडले, तेव्हा त्यांच्या शक्तीची जाणीव कोणाला झाली ?॥१॥

ऐतान्रथेषु तस्थुषः कः शुश्राव कथा ययुः ।
कस्मै सस्रुः सुदासे अन्वापय इळाभिर्वृष्टयः सह ॥२ ॥

आपल्या रथांवर आरूढ होऊन प्रवास करणाऱ्या मरुद्गणांबद्दल कोणी ऐकले आहे का ? त्यांच्या प्रवासाची पद्धत कोणाला ठाऊक आहे? पोषणाने युक्त असणारी त्यांची जलवृष्टी कोणत्या उत्तम दान देणाऱ्या भक्तगणांसाठी(सुदास नावाच्या राजासाठी) झाली आहे? ॥२ ॥

ते म आहुर्य आययुरुप द्युभिर्विभिर्मदे ।
नरो मर्या अरेपस इमान्पश्यन्निति ष्टुहि ॥३ ॥

श्यावाश्व आत्रेयऋषि सांगत आहे, "मरुद्गण आपल्या अत्यंत तेजस्वी आणि वेगवान अश्वांवर स्वार होऊन, सोमरूपी आनंदाचा स्वीकार करण्यासाठी येथे जवळ आले आहेत. ते मरुद्गण मला म्हणाले– 'हे ऋषे ! दिव्य रूप धारण करणाऱ्या, सर्व शक्तिमान आणि पूर्णपणे

निष्पाप असलेल्या आम्हा मरुद्गणांकडे तू बघ आणि स्तुती कर
" ॥३ ॥

ये अञ्जिषु ये वाशीषु स्वभानवः स्रक्षु रुक्मेषु खादिषु ।
श्राया रथेषु धन्वसु ॥४ ॥
हे मरुद्गणांनो ! आपण स्वतःच्या प्रकाशाने, अंगावर विविध अलंकारांनी , तीक्ष्ण शस्त्रांनी, गळ्यातील हारांनी, छातीवरील सोन्याच्या पदकांनी आणि हातातील कड्यांनी सुशोभित झालां आहात. आपण धनुष्यबाण धारण करून आपल्या रथामध्ये वैभवाने विराजमान झाले आहात. ॥४ ॥

युष्माकं स्मा रथाँ अनु मुदे दधे मरुतो जीरदानवः ।
वृष्टी द्यावो यतीरिव ॥५ ॥
हे त्वरेने दान देणाऱ्या मरुद्गणांनो ! आकाशातून कोसळणाऱ्या पावसाच्या धारांप्रमाणे धावणाऱ्या आपल्या रथांच्या आगमनाने आम्ही आनंदित होतो. ॥५ ॥

आ यं नरः सुदानवो ददाशुषे दिवः कोशमचुच्यवुः ।
वि पर्जन्यं सृजन्ति रोदसी अनु धन्वना यन्ति वृष्टयः ॥६ ॥
हे अत्यंत दानशूर आणि पराक्रमी मरुद्गणांनो !आपण , यज्ञकर्त्या भक्तगणांसाठी आकाशातील पाण्याचा खजिना (ढग) खाली उतरवता. आकाश आणि पृथ्वी या दोन्ही बाजूंनी पर्जन्याला मुक्त करता, त्यामुळे कोरड्या भूमीवरून पावसाच्या धारा वाहू लागतात.॥६ ॥

ततृदानाः सिन्धवः क्षोदसा रजः प्र सस्रुर्धेनवो यथा ।
स्यन्ना अश्वा इवाध्वनो विमोचने वि यद्वर्तन्त एन्यः ॥७॥
ज्याप्रमाणे बंधनातून मुक्त झालेल्या गायी वेगाने धावतात, किंवा रथातून मोकळे केलेले वेगवान अश्व आपल्या मार्गावर आनंदाने धावू लागतात, त्याप्रमाणेच हे बंधनमुक्त झालेले नद्यांच्या पाण्याचे प्रवाह आपल्या पूर्ण वेगाने पुढे वाहत आहेत ॥७ ॥

आ यात मरुतो दिव आन्तरिक्षादमादुत ।
माव स्थात परावतः ॥८ ॥
हे मरुद्गणांनो ! आपण स्वर्गातून, अंतरिक्षातून आणि सर्व ठिकाणांहून आमच्याकडे यावे ही विनंती. आपण आम्हापासून अतिशय दूर अंतरावर थांबून राहू नका. ॥८ ॥

मा वो रसानितभा कुभा क्रुमुर्मा वः सिन्धुर्नि रीरमत् ।
मा वः परि ष्ठात्सरयुः पुरीषिण्यस्मे इत्सुम्नमस्तु वः ॥९ ॥
हे मरुद्गणांनो ! रसा, अनितभा, कुभा किंवा विशाल अशी सिंधु नदी आपल्याला वाटेत थांबवून न ठेवो. पाण्याने पूर्ण भरलेली सरयु नदी आपला मार्ग न रोखो. आपल्या आगमनाचे परम सुख केवळ आम्हांला प्राप्त होवो ही विनंती ॥९ ॥

तं वः शर्धं रथानां त्वेषं गणं मारुतं नव्यसीनाम् ।
अनु प्र यन्ति वृष्टयः ॥१० ॥
हे मरुद्गणांनो ! आपल्या नित्य नूतन असणाऱ्या रथांच्या वेगाची आणि तेजाची आम्ही भक्तगण स्तुती करतो. आपल्या मागोमाग पावसाच्या धारा कोसळत पुढे जातात ॥१० ॥

शर्धंशर्धं व एषां व्रातंव्रातं गणंगणं सुशस्तिभिः ।
अनु क्रामेम धीतिभिः ॥११ ॥
हे मरुद्गणांनो ! आम्ही भक्तगण आपल्या पराक्रमी प्रत्येक सैन्याचे आणि प्रत्येक गटांचे आणि समूहांचे आमच्या उत्तम विचारांनी आणि श्रेष्ठ स्तुतियुक्त स्तोत्रांनी अनुकरण करतो. ॥११ ॥

कस्मा अद्य सुजाताय रातहव्याय प्र ययुः ।
एना यामेन मरुतः ॥१२ ॥
हे मरुद्गणांनो ! आज आपण आपल्या रथातून कोणत्या हविष्यान्नाची आहुती देणाऱ्या भक्तगणांकडे वेगाने पुढे निघून गेला आहात ?॥१२ ॥

येन तोकाय तनयाय धान्यं बीजं वहध्वे अक्षितम् ।
अस्मभ्यं तद्धत्तन यद्ध ईमहे राधो विश्वायु सौभगम् ॥१३ ॥
हे मरुद्गणांनो ! आपण आमच्या मुलाबाळांसाठी जे कधीही नष्ट न होणारे अक्षय अन्नधान्य वाहून आणता, तेच आयुष्यभर टिकणारे ऐश्वर्य आणि सौभाग्य आपण आम्हाला प्रदान करावे. आम्ही आपल्याकडे त्याची प्रार्थना करत आहोत.॥१३ ॥

अतीयाम निदस्तिरः स्वस्तिभिर्हित्वावद्यमरातीः ।
वृष्ट्वी शं योराप उस्रि भेषजं स्याम मरुतः सह ॥१४ ॥
हे मरुद्गणांनो !आपल्या सहवासात आणि कृपेने आम्ही आमच्या निंदा करणाऱ्यांना आणि शत्रूंना मागे टाकून, कल्याणाच्या मार्गाने सर्व संकटे पार करू . आपण आमच्यावर सुख आणि शांतीचा वर्षाव करावा ही विनंती .आपल्या दिव्य प्रकाशात आम्हाला रोगमुक्त आरोग्य प्राप्त होवो. ॥१४॥

सुदेवः समहासति सुवीरो नरो मरुतः स मर्त्यः ।
यं त्रायध्वे स्याम ते ॥१५॥
हे मार्गदर्शक मरुद्गणांनो ! आपण ज्या मर्त्य मानवाचे रक्षण करता, तो देवांच्या कृपेस पात्र ठरतो. त्याला उत्तम पुत्र पौत्र प्राप्त होतात. आपण आम्हा भक्तगणांचे सुद्धा उत्तम प्रकारे रक्षण करावे ही विनंती. ॥१५ ॥

स्तुहि भोजान्त्स्तुवतो अस्य यामनि रणन्गावो न यवसे ।
यतः पूर्वाँ इव सखींरनु ह्वय गिरा गृणीहि कामिनः ॥१६॥
हे भक्तगणांनो ! आपण या यज्ञाच्या प्रसंगी दानशूर मरुद्गणांची स्तुती करावी. गवतावर चरायला जाताना गायी जशा आनंदी असतात, त्याचप्रमाणे मरुद्गणांनाही आनंद व्हायला हवा. वेगवान मरुद्गणांना जुन्या मित्रांप्रमाणे बोलवा आणि स्तुतीची इच्छा असलेल्या मरुद्गणांची स्तोत्रांनी स्तुती करा. ॥१६ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-५४

ऋषि- शयावाश्व आत्रेय **देवता** – मरुद्गण **छन्द** – दानशूर १४त्रिष्टुप्

प्र शर्धाय मारुताय स्वभानव इमां वाचमनजा पर्वतच्युते ।
घर्मस्तुभे दिव आ पृष्ठयज्वने द्युम्नश्रवसे महि नृम्णमर्चत ॥१॥
हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! स्वतःच्या प्रकाशाने चमकणाऱ्या आणि पर्वतांनाही थरथरवून हलवणाऱ्या पराक्रमी मरुद्गणांसाठी ही स्तुतियुक्त स्तोत्रे अर्पण करावीत. आकाशाच्या शिखरावर निवास करणाऱ्या, अत्यंत तेजस्वी कीर्ती असणाऱ्या आणि घर्म-यज्ञाची स्तुती करणाऱ्या त्या मरुद्गणांच्या महान बलाची आणि शौर्याची उत्तम प्रकारे स्तुती करावी ॥१॥
(यज्ञातील विधीमध्ये मातीच्या पात्रात गाईचे दूध आणि तूप एकत्र करून ते अत्यंत उच्च तापमानाला उकळले जाते. त्या उकळत्या द्रवाला किंवा पात्राला 'घर्म' म्हणतात.)

प्र वो मरुतस्तविषा उदन्यवो वयोवृधो अश्वयुजः परिज्रयः ।
सं विद्युता दधति वाशति त्रितः स्वरन्त्यापोऽवना परिज्रयः॥२ ॥
हे अत्यंत शक्तिशाली, वेगवान अश्व रथाला जोडणाऱ्या आणि सर्वत्र संचार करणाऱ्या मरुद्गणांनो ! आपण पाऊस पाडणारे, शक्ती वाढवणारे आहात. आपण जेव्हा विजांच्या कडकडाटासह गर्जना करतात, तेव्हा अंतरिक्षामध्ये मोठा आवाज होतो (त्रित) आणि चहुबाजूला पसरणारे जलप्रवाह व नद्या प्रवाहित होतात ॥२ ॥

विद्युन्महसो नरो अश्मदिद्यवो वातत्विषो मरुतः पर्वतच्युतः ।
अब्दया चिन्मुहुरा ह्रादुनीवृतः स्तनयदमा रभसा उदोजसः॥३॥

विजेच्या लखलखाटाने दैदिप्यमान असणारे, पाऊस पडणारे, दगडासारखे कठीण आणि मजबूत शस्त्रे बाळगणारे, वाऱ्याच्या वेगाने पर्वतांना व ढगांनाही कंपायमान करणारे मरुद्गण प्रकट झाले आहेत. प्रचंड शक्तिशाली आणि वेगवान असणारे हे मरुद्गण विजेच्या आणि ढगांच्या कडकडाटासह पुन्हा पुन्हा पृथ्वीवर पाण्याचा वर्षाव करत आहेत. ॥३ ॥

व्यक्तून्नुद्रा व्यहानि शिक्वसो व्यन्तरिक्षं वि रजांसि धूतयः ।
वि यदज्राँ अजथ नाव ईं यथा वि दुर्गाणि मरुतो नाह रिष्यथ ॥४॥
हे कार्यकुशल रुद्रपुत्र मरुद्गणांनो ! आपण रात्रींना आणि दिवसांना प्रकाशित करणारे आहात. संपूर्ण अंतरिक्ष आणि वायुमंडळ आपण आपल्या वेगाने व्यापून टाकता. ज्याप्रमाणे समुद्रातील वारा नौकांना पुढे ढकलतो त्याप्रमाणे आपण ढगांना आणि आकाशाला गती देता कोणत्याही संकटाचा सामना करताना आपण न डगमगता स्वतःला कोणतीही इजा न पोहोचवता सुरक्षितपणे पुढे जाता॥४ ॥

तद्वीर्यं वो मरुतो महित्वनं दीर्घं ततान सूर्यो न योजनम् ।
एता न यामे अगृभीतशोचिषोऽनश्वदां यन्न्ययातना गिरिम्॥५ ॥
हे मरुद्गणांनो ! आपले सामर्थ्य आणि महानता, ज्याप्रमाणे सूर्यदेव आपला प्रकाश सर्वत्र पसरवतो, त्याप्रमाणे सर्वत्र दूरवर पसरली आहे. हे अद्भुत तेजस्वी मरुद्गणांनो ! जेव्हा आपण प्रवासाला निघता तेव्हा आपल्या वेगाने पर्वत खाली झुकतात आणि अक्षय अन्न (अनश्वदाम्) प्रदान करता. ॥५ ॥

अभ्राजि शर्धो मरुतो यदर्णसं मोषथा वृक्षं कपनेव वेधसः ।
अध स्मा नो अरमतिं सजोषसश्चक्षुरिव यन्तमनु नेषथा सुगम्॥६॥

हे दैदिप्यमान, वृक्षाला छिन्नविच्छिन्न करणाऱ्या लाकूडतोड्या प्रमाणे अडथळे दूर करणाऱ्या मरुद्गणांनो ! आपण आमच्यावर प्रसन्न होऊन, एका अंध व्यक्तीला डोळ्यांनी मार्ग दिसावा, त्याप्रमाणे आम्हा भक्तगणांना सन्मार्गाचा आणि मोक्षाचा मार्ग दाखवावा ही विनंती ॥६ ॥

न स जीयते मरुतो न हन्यते न स्रेधति न व्यथते न रिष्यति ।
नास्य राय उप दस्यन्ति नोतय ऋषिं वा यं राजानं वा सुषूदथ॥७॥
हे मरुद्गणांनो ! आपण ज्या ऋषींना किंवा राजाला आपला आशीर्वाद देता त्याचा पराभव होत नाही, अधःपात होत नाही, आणि तो मार्गभ्रष्ट होत नाही. त्याला कधीही भय सतावत नाही त्याचे कधी नुकसान होत नाही. त्याची संपत्ती आणि संरक्षणाची साधने कधीही संपत नाहीत.॥७॥

नियुत्वन्तो ग्रामजितो यथा नरोऽर्यमणो न मरुतः कबन्धिनः ।
पिन्वन्त्युत्सं यदिनासो अस्वरन्व्युन्दन्ति पृथिवीं मध्वो अन्धसा॥८ ॥
हे मरुद्गणांनो ! ज्याप्रमाणे सूर्यदेव आपले तेज पसरवतात त्याप्रमाणे आपण वेगाने प्रवास करत विजय मिळवणारे, हातामध्ये पाण्याचे ढग धारण करणारे, पराक्रमी आहात. आपण ज्या वेळेला गर्जना करत जलाचे स्रोत असलेल्या ढगांना मोकळे करता तेव्हा आपण आपल्या गोड, अमृततुल्य पाण्याने पृथ्वीला ओलेचिंब करून तिला अन्न-धान्याने समृद्ध करता। ॥८॥.

प्रवत्वतीयं पृथिवी मरुद्भ्यः प्रवत्वती द्यौर्भवति प्रयद्भ्यः ।
प्रवत्वतीः पथ्या अन्तरिक्ष्याः प्रवत्वन्तः पर्वता जीरदानवः॥९॥

हे मरुद्गणांनो ! आपल्या प्रभावामुळे ही पृथ्वी जलमय आणि गतिमान बनते. आपल्या संचारामुळे आकाशही गतिमान भासते. अंतरिक्षातील सर्व मार्ग वेगाने वाहू लागतात आणि जीवन देणारे ढगातील पाणी प्रवाहित होते ॥९ ॥

यन्मरुतः सभरसः स्वर्णरः सूर्य उदिते मदथा दिवो नरः ।
न वोऽश्वाः श्रथयन्ताह सिस्रतः सद्यो अस्याध्वनः पारमश्नुथ॥१०॥
हे स्वर्गाचे नेते आणि शक्तीने भारलेल्या तेजस्वी मरुद्गणांनो ! सूर्यदेवांच्या उदयानंतर जेव्हा आपण आनंदित होता तेव्हा आपले अश्व कधीही थकत नाही आणि आपण एका क्षणात अंतिम ध्येयापर्यंत पोहोचता ॥१० ॥

अंसेषु व ऋष्टयः पत्सु खादयो वक्षस्सु रुक्मा मरुतो रथे शुभः ।
अग्निभ्राजसो विद्युतो गभस्त्योः शिप्राः शीर्षसु वितता हिरण्ययीः॥११ ॥
हे मरुद्गणांनो ! आपल्या खांद्यावर शस्त्रे, पायामध्ये सोन्याची कडी, छातीवर शोभून दिसणारे सोन्याचे हार, रथावर अग्निदेवांसारखे, विजेसारखे तेज आणि आपल्या मस्तकावर सोन्याचा चमकदार मुकुट आहे ॥११ ॥

तं नाकमर्यो अगृभीतशोचिषं रुशत्पिप्पलं मरुतो वि धूनुथ ।
समच्यन्त वृजनातित्विषन्त यत्स्वरन्ति घोषं वितत्मृतायवः॥१२॥
हे शत्रूंचा नाश करणाऱ्या मरुद्गणांनो ! आपल्या कोणालाही रोखता येणार नाही अशा तेजाने आपण जलाने भरलेल्या ढगांना हलवून सोडता. आपण आपली सर्व शक्ती एकत्रित करून निसर्गाच्या नियमाप्रमाणे विजेची गर्जना करत पावसाची वृष्टी करता. ॥१२ ॥

युष्मादत्तस्य मरुतो विचेतसो रायः स्याम रथ्यो वयस्वतः ।
न यो युच्छति तिष्यो यथा दिवोऽस्मे रारन्त मरुतः सहस्रिणम्॥१३ ॥
हे परम ज्ञानी आणि विवेक बुद्धी असलेल्या मरुद्गणांनो ! आम्हा भक्तगणांना आपल्या कृपेने , अन्नाने समृद्ध, प्रगतीशील ऐश्वर्य प्राप्त होवो ही विनंती. ज्याप्रमाणे पुष्य नक्षत्र (तिष्यो) आपला मार्ग कधीच सोडत नाही त्याप्रमाणे आमचे ऐश्वर्य आम्हाला सोडून कधी दूर जाऊ नये ही विनंती. आमच्यावर प्रसन्न होऊन आम्हाला हजारो पटीने समृद्धी प्रदान करावी ही विनंती. ॥१३ ॥

यूयं रयिं मरुतः स्पार्हवीरं यूयमृषिमवथ सामविप्रम् ।
यूयमर्वन्तं भरताय वाजं यूयं धत्थ राजानं श्रुष्टिमन्तम्॥१४ ॥
हे मरुद्गणांनो ! आपण भक्तगणांना इच्छित आणि पराक्रमी पुत्रांनी युक्त असे धन प्रदान करता, आपण सामवेदाचे गायन करणाऱ्या विद्वान ऋषींचे रक्षण करता. आपण योद्ध्याला वेगवान अश्व आणि विजय प्राप्त करून देता. आपण पृथ्वीचे पालन करणाऱ्या राजाला ऐश्वर्य प्रदान करता. ॥१४ ॥

तद्वो यामि द्रविणं सद्यऊतयो येना स्वर्ण ततनाम नॄँरभि ।
इदं सु मे मरुतो हर्यता वचो यस्य तरेम तरसा शतं हिमाः॥१५ ॥
हे त्वरित रक्षण करणाऱ्या मरुद्गणांनो ! आम्ही आपल्याकडे ऐश्वर्याचीच याचना करतो, ज्याच्या बळावर आम्ही सूर्यदेवांप्रमाणे आमचा प्रभाव इतर लोकांवर टाकू शकू. आमच्या मनापासून केलेल्या स्तुतियुक्त स्तोत्रांचा आपण प्रेमाने स्वीकार करावा, ज्याच्या प्रभावाने आम्ही शंभर हिवाळे सुखाने पार करू शकू. ॥१५ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-५५

ऋषि- शयावाश्व आत्रेय **देवता** – मरुद्गण **छन्द** – जगती १० त्रिष्टुप्

प्रयज्यवो मरुतो भ्राजदृष्टयो बृहद्वयो दधिरे रुक्मवक्षसः ।
ईयन्ते अश्वैः सुयमेभिराशुभिः शुभं यातामनु रथा अवृत्सत ॥१॥
अत्यंत पूजनीय, छातीवर सोन्याचे अलंकार परिधान केलेले आणि चमकदार शस्त्रांनी सुसज्ज असलेले मरुद्गण अथांग शक्ती व अन्न प्राप्त करतात. हे मरुद्गणांनो आपण उत्तम प्रकारे नियंत्रणात राहणाऱ्या आणि अत्यंत वेगवान अशा अश्वांवर स्वार होऊन प्रवास करता. आपण प्रवासाला निघाल्यावर आपला रथ सुखाने आणि आनंदाने चालत राहो ॥१॥

स्वयं दधिध्वे तविषीं यथा विद बृहन्महान्त उर्विया वि राजथ ।
उतान्तरिक्षं ममिरे व्योजसा शुभं यातामनु रथा अवृत्सत ॥२ ॥
हे मरुद्गणांनो ! आपण स्वबळावर, ज्ञानाने आपल्या अंगी सामर्थ्य अंगीकारता. आपण महान आणि विशाल असून या विस्तीर्ण विश्वावर राज्य करता, संपूर्ण अंतराळ व्यापून टाकता. आपण प्रवासाला निघाल्यावर आपला रथ सुखाने आणि आनंदाने चालत राहो ॥२ ॥

साकं जाताः सुभ्वः साकमुक्षिताः श्रिये चिदा प्रतरं वावृधुर्नरः ।
विरोकिणः सूर्यस्येव रश्मयः शुभं यातामनु रथा अवृत्सत ॥३ ॥
एकाच वेळी एकत्र जन्मलेले आणि एकत्रच वाढलेले, उत्तम सामर्थ्यवान मरुद्गण स्वतःच्या कल्याणासाठी पुढे पुढेच समृद्ध झाले आहेत. अत्यंत प्रकाशमान असलेल्या सूर्यदेवांच्या किरणांप्रमाणे,

आपण प्रवासाला निघाल्यावर आपला रथ सुखाने आणि आनंदाने चालत रहातो ॥३ ॥

आभूषेण्यं वो मरुतो महित्वनं दिदृक्षेण्यं सूर्यस्येव चक्षणम् ।
उतो अस्माँ अमृतत्वे दधातन शुभं यातामनु रथा अवृत्सत ॥४ ॥
हे मरुद्गणांनो ! सूर्यदेवांच्या प्रकाशाप्रमाणे आपले सामर्थ्य अत्यंत दर्शनीय आहे. आपण आम्हा भक्तगणांना अमरत्व प्रदान करता. आपण प्रवासाला निघाल्यावर आपला रथ सुखाने आणि आनंदाने चालत रहातो. ॥४ ॥

उदीरयथा मरुतः समुद्रतो यूयं वृष्टिं वर्षयथा पुरीषिणः ।
न वो दस्रा उप दस्यन्ति धेनवः शुभं यातामनु रथा अवृत्सत ॥५ ॥
हे जलसमृद्ध मरुद्गणांनो ! आपण जलाशयातून पाण्याने समृद्ध असणारे ढग वर उठवता आणि पावसाला पृथ्वीवर पाडता. हे संकटाचा नाश करणाऱ्या मरुद्गणांनो ! दूध देणाऱ्या गायी (पाणी देणारे ढग) कधीही आटत नाहीत. आपण प्रवासाला निघाल्यावर आपला रथ सुखाने आणि आनंदाने चालत रहातो. ॥५ ॥

यदश्वान्धूर्षु पृषतीरयुग्ध्वं हिरण्ययान्प्रत्यत्काँ अमुग्ध्वम् ।
विश्वा इत्स्पृधो मरुतो व्यस्यथ शुभं यातामनु रथा अवृत्सत ॥६ ॥
हे मरुद्गणांनो ! जेव्हा आपण आपल्या रथाला ठिपके असलेला हरण जोडता, स्वतःच्या अंगावर सोन्याची वस्त्रे आणि अलंकार परिधान करता तेव्हा आपण आपल्या सर्व शत्रूंना नष्ट करता. आपण

प्रवासाला निघाल्यावर आपला रथ सुखाने आणि आनंदाने चालत रहातो. ॥६ ॥

न पर्वता न नद्यो वरन्त वो यत्राचिध्वं मरुतो गच्छथेदु तत् ।
उत द्यावापृथिवी याथना परि शुभं यातामनु रथा अवृत्सत ॥७ ॥

हे मरुद्गणांनो ! कोणतीही प्रचंड नदी किंवा अथांग पर्वत आपल्या मार्गात अडथळा आणू शकत नाही. आपण जिथे जाण्याचे मनात ठरवता, तिथे आपण निश्चितपणे पोहोचता. आपण स्वर्ग आणि पृथ्वी या दोन्ही लोकांच्या चहूबाजूंनी मुक्तपणे संचार करता. आपण प्रवासाला निघाल्यावर आपला रथ सुखाने आणि आनंदाने चालत राहतो. ॥७ ॥

यत्पूर्व्यं मरुतो यच्च नूतनं यदुद्यते वसवो यच्च शस्यते ।
विश्वस्य तस्य भवथा नवेदसः शुभं यातामनु रथा अवृत्सत ॥८ ॥

हे आश्रयदात्या मरुद्गणांनो ! जे प्राचीन काळी गायले गेले, ते आज नवीन रचले गेले आहे, जे आता म्हटले जात आहे आणि ज्याची पुढे प्रशंसा केली जाईल त्या सर्व स्तुतियुक्त स्तोत्रांचे आपण जाणकार आहात. आपण प्रवासाला निघाल्यावर आपला रथ सुखाने आणि आनंदाने चालत राहतो. ॥८ ॥

मृळत नो मरुतो मा वधिष्टनास्मभ्यं शर्म बहुलं वि यन्तन ।
अधि स्तोत्रस्य सख्यस्य गातन शुभं यातामनु रथा अवृत्सत ॥९ ॥

आपण आम्हांवर दया करावी, आमचा नाश करू नये, आमच्यासाठी विपुल प्रमाणात सुख, शांती आणि विस्तृत संरक्षण प्रदान करावे ही

विनंती . आमच्या या स्तुतियुक्त स्तोत्राचा, आमच्या मैत्रीचा स्वीकार करावा ही विनंती. आपण प्रवासाला निघाल्यावर आपला रथ सुखाने आणि आनंदाने चालत रहातो. ॥९ ॥

यूयमस्मान्नयत वस्यो अच्छा निरंहतिभ्यो मरुतो गृणानाः ।
जुषध्वं नो हव्यदातिं यजत्रा वयं स्याम पतयो रयीणाम् ॥१० ॥
हे पूजनीय मरुद्गणांनो ! आम्हा भक्तगणांच्या स्तुतीचा स्वीकार करून आम्हांला सर्व संकटांतून बाहेर काढावे ही विनती. आमच्या द्वारे अर्पण केलेल्या हविष्यान्नाच्या आहुतीचा आपण आनंद पूर्वक स्वीकार करावा ही विनंती. आपल्या कृपेने आम्हांला सर्व प्रकारच्या धन-धान्य संपत्तीचे स्वामी बनवावे ही विनती.॥१० ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-५६

ऋषि- श्यावाश्व आत्रेय **देवता** – मरुद्गण **छन्द** – बृहती; ३ , ७ सतोबृहती

अग्ने शर्धन्तमा गणं पिष्टं रुक्मेभिरञ्जिभिः ।
विशो अद्य मरुतामव ह्वये दिवश्चिद्रोचनादधि ॥१॥
हे अग्निदेवा ! सोन्याच्या दागिन्यांनी आणि चमकणाऱ्या अलंकारांनी सुशोभित झालेल्या, पराक्रमी आणि बलाढ्य मरुद्गणांचे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण स्वर्गाच्या अत्यंत प्रकाशमान स्थानावरून पृथ्वीवर आमचे रक्षण करण्यासाठी आवाहन करतो ॥१॥

यथा चिन्मन्यसे हृदा तदिन्मे जग्मुराशसः ।
ये ते नेदिष्ठं हवनान्यागमन्तान्वर्ध भीमसंदृशः ॥२॥
हे अग्निदेवा! आपण अंतःकरणातून ज्या प्रकारे मरुद्गणांचा आदर करता त्या प्रकारे मरुद्गण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी येवोत. जे मरुद्गण आपल्या आवाहनाला मान देऊन अत्यंत वेगाने धावून आले आहेत, त्या उग्र रूप असणाऱ्या मरुद्गणांना सामर्थ्यवान करावे ॥२ ॥

मीळ्हुष्मतीव पृथिवी पराहता मदन्त्येत्यस्मदा ।
ऋक्षो न वो मरुतः शिमीवाँ अमो दुध्रो गौरिव भीमयुः ॥३॥
हे मरुद्गणांनो ! ज्याप्रमाणे पराक्रमी पती लाभलेली स्त्री संकटसमयी आनंदाने आणि विश्वासाने आपल्या पतीकडे धाव घेते, त्याप्रमाणे आम्ही भक्तगण पीडित झाल्यावर आपल्याकडे आशेने बघतो. आपण

एखाद्या बलवान प्राण्याप्रमाणे पराक्रमी, शत्रूच्या मनात भीती निर्माण करणाऱ्या शक्तिशाली बैलाप्रमाणे अजिंक्य आहात. ॥३ ॥

नि ये रिणन्त्योजसा वृथा गावो न दुर्धुरः ।
अश्मानं चित्स्वर्यं पर्वतं गिरिं प्र च्यावयन्ति यामभिः ॥४॥
नियंत्रणात न येणाऱ्या बैलांप्रमाणे, जे आपल्या प्रचंड शक्तीने सर्व काही सहजपणे वाहवून नेतात, असे मरुद्गण आपल्या हालचालीने गडगडाटात मोठ्या पर्वतांना आणि डोंगरांना सुद्धा त्यांच्या जागेवरून उखडून फेकतात. ॥४ ॥

उत्तिष्ठ नूनमेषां स्तोमैः समुक्षितानाम् ।
मरुतां पुरुतममपूर्व्यं गवां सर्गमिव ह्वये ॥५॥
स्तुतियुक्त स्तोत्रांनी आनंदित झालेल्या, अद्वितीय मरुद्गणांना आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आवाहन करतो. ज्याप्रमाणे गायी मुक्तपणे उभ्या राहतात त्याप्रमाणे आम्ही भक्तगण मरुद्गणांना आवाहन करण्यासाठी उठून उभे राहतो ॥५॥

युङ्ग्ध्वं ह्यरुषी रथे युङ्ग्ध्वं रथेषु रोहितः ।
युङ्ग्ध्वं हरी अजिरा धुरि वोळ्हवे वहिष्ठा धुरि वोळ्हवे ॥६॥
हे मरुद्गणांनो ! आपण आपल्या रथाला, भार वाहून नेण्यासाठी श्रेष्ठ आणि उत्तम, कधीही न थकणाऱ्या, अत्यंत वेगाने धावणाऱ्या लाल रंगाच्या हरी नावाच्या अश्वांना जोडावे ही विनंती. ॥६ ॥

उत स्य वाज्यरुषस्तुविष्वणिरिह स्म धायि दर्शतः ।
मा वो यामेषु मरुतश्चिरं करत्प्र तं रथेषु चोदत ॥७॥

हे मरुद्गणांनो ! आपण, वेगाने धावणाऱ्या, अग्निदेवांसारखे तेजस्वी, दर्शनीय, गर्जना करणारे असे अश्व रथाला जोडले आहेत, त्यामुळे आपल्या प्रवासात आपण वेगाने पुढे जाता. ॥७ ॥

रथं नु मारुतं वयं श्रवस्युमा हुवामहे ।
आ यस्मिन्तस्थौ सुरणानि बिभ्रती सचा मरुत्सु रोदसी ॥८॥
आम्ही यज्ञकर्ते भक्तगण मरुद्गणांच्या त्या दिव्य आणि कीर्तिमान रथाला आवाहन करतो, ज्या रथावर अत्यंत आनंददायी, दिव्य आकाशदेवता आणि पृथ्वीदेवता मरुद्गणांच्या सोबत एकत्र होऊन विराजमान झाल्या आहेत ॥८॥

तं वः शर्धं रथेशुभं त्वेषं पनस्युमा हुवे ।
यस्मिन्त्सुजाता सुभगा महीयते सचा मरुत्सु मीळ्हुषी ॥९ ॥
रथावर आरूढ झाल्यावर अत्यंत शोभिवंत दिसणाऱ्या, तेजस्वी, पराक्रमी आणि स्तुतीस पात्र मरुद्गणाना आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आवाहन करतो. भक्तांच्या इच्छा पूर्ण करणारी, उत्तम कुळात जन्मलेली आणि भाग्यवान देवी मरुद्गणांच्या सोबत राहून गौरव मिळवते. ॥९ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-५७

ऋषि- श्यावाश्व आत्रेय **देवता** – मरुद्गण **छन्द** – जगती, ७-८त्रिष्टुप्

आ रुद्रास इन्द्रवन्तः सजोषसो हिरण्यरथाः सुविताय गन्तन ।
इयं वो अस्मत्प्रति हर्यते मतिस्तृष्णजे न दिव उत्सा उदन्यवे ॥१॥
हे सोन्याच्या रथात बसलेल्या, इंद्रदेवांचे सोबती असणाऱ्या आणि एका विचाराने राहणाऱ्या मरुद्गणांनो ! आपण आमच्या कल्याणासाठी यज्ञस्थळी यावे ही विनंती. पाणी इच्छिणाऱ्या एखाद्या तहानलेल्या माणसाला आकाशातून पाण्याचे झरे मिळावे, त्याप्रमाणे आमच्याकडून आपल्यासाठी पठण केलेली ही स्तुतियुक्त स्तोत्रे आपण स्वीकारावीत ही विनंती ॥१॥

वाशीमन्त ऋष्टिमन्तो मनीषिणः सुधन्वान इषुमन्तो निषङ्गिणः ।
स्वश्वाः स्थ सुरथाः पृश्निमातरः स्वायुधा मरुतो याथना शुभम् ॥२॥
उत्तम कुऱ्हाडी आणि भाले धारण केलेले, परम बुद्धिमान, श्रेष्ठ धनुष्य, बाण आणि भात्याने सज्ज असलेले, उत्तम अश्व व दिव्य रथ असणारे, आणि पृश्निमातेचे पुत्र हे मरुद्गणांनो ! आपण आपल्या दिव्य व कल्याणकारी शस्त्रांनी सुसज्ज होऊन जगाच्या कल्याणासाठी मार्गक्रमण करावे ही विनंती . ॥२ ॥

धूनुथ द्यां पर्वतान्दाशुषे वसु नि वो वना जिहते यामनो भिया ।
कोपयथ पृथिवीं पृश्निमातरः शुभे यदुग्राः पृषतीरयुग्ध्वम् ॥३ ॥

हे पराक्रमी, पृश्नीमातेच्या पुत्रांनो, मरुद्गणांनो ! जेव्हा आपण शुभ कार्यासाठी आपल्या रथांना ठिपक्याठिपक्यांचे (चितळ) हरिण जोडता तेव्हा आपल्या भीतीने पर्वत कंपायमान होतात, जंगले खाली झुकतात आणि संपूर्ण पृथ्वी थरथर कापते ॥३॥

वातत्विषो मरुतो वर्षनिर्णिजो यमा इव सुसदृशः सुपेशसः ।
पिशङ्गाश्वा अरुणाश्वा अरेपसः प्रत्वक्षसो महिना द्यौरिवोरवः ॥४ ॥

हे वेगवान, तेजस्वी, वृष्टी करणाऱ्या मरुद्गणांनो ! आपण जुळ्या अश्विनीकुमारांप्रमाणे अत्यंत देखणे आहात. पिवळसर, आरक्त वर्णीय अश्व बाळगणाऱ्या, निष्पाप व पराक्रमी हे मरुद्गणांनो ! आपली महानता या विस्तीर्ण आकाशासारखी सर्वत्र पसरली आहे॥४ ॥

पुरुद्रप्सा अञ्जिमन्तः सुदानवस्त्वेषसंदृशो अनवभ्रराधसः ।
सुजातासो जनुषा रुक्मवक्षसो दिवो अर्का अमृतं नाम भेजिरे ॥५॥

पुष्कळ जलकण धारण करणारे, तेजाने सुशोभित झालेले, अत्यंत उदार, पाहायला अत्यंत तेजस्वी आणि कधीही नष्ट न होणाऱ्या वैभवाने संपन्न असलेले मरुद्गण जन्मापासूनच श्रेष्ठ गुणांचे आहेत. आपल्या छातीवर सोन्याचे अलंकार धारण करणाऱ्या स्वर्गातील या पूजनीय मरुद्गणांनी अमरत्व प्राप्त केले आहे ॥५ ॥

ऋष्टयो वो मरुतो अंसयोरधि सह ओजो बाह्वोर्वो बलं हितम् ।
नृम्णा शीर्षस्वायुधा रथेषु वो विश्वा वः श्रीरधि तनूषु पिपिशे ॥६॥

हे मरुद्गणांनो ! आपण आपल्या खांद्यावर शस्त्रे परिधान केली आहेत, हातामध्ये शत्रूला पराभूत करणारे सामर्थ्य आहे, मस्तकावर शौर्याचा

मुकुट विराजमान आहे, आपल्या रथामध्ये विविध आयुधे सज्ज आहेत. आपल्या शरीरात सौंदर्य आहे. ॥६ ॥

गोमदश्वावद्रथवत्सुवीरं चन्द्रवद्राधो मरुतो ददा नः ।
प्रशस्तिं नः कृणुत रुद्रियासो भक्षीय वोऽवसो दैव्यस्य ॥७॥
हे रुद्रपुत्र मरुद्गणांनो ! आपण आम्हाला गायी, घोडे, रथ ,पराक्रमी वीरांनी युक्त ,चंद्रासारखे आल्हाददायक ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती. आम्हाला नावलौकिक मिळो आणि आपल्या रक्षणाचा आणि कृपेचा लाभ मिळो ही विनंती ॥७॥

हये नरो मरुतो मृळता नस्तुवीमघासो अमृता ऋतज्ञाः ।
सत्यश्रुतः कवयो युवानो बृहद्गिरयो बृहदुक्षमाणाः ॥८ ॥
हे नेतृत्व करणाऱ्या मरुद्गणांनो ! आपण विपुल ऐश्वर्य देणारे, अमर, वैश्विक सत्याचे ज्ञान असणारे आणि सत्याचा आदर करणारे आहात. आपण सर्वज्ञ, सदैव तरुण, महान स्तोत्रांनी स्तुती करण्यास योग्य आणि समृद्धीचा वर्षाव करणारे आहात . आपण आम्हा भक्तगणांवर कृपा करून आम्हाला सुखी करावे ही विनंती. ॥८ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-५८

ऋषि- श्यावाश्व आत्रेय **देवता** – मरुद्गण **छन्द**- त्रिष्टुप्

तमु नूनं तविषीमन्तमेषां स्तुषे गणं मारुतं नव्यसीनाम् ।
य आश्वश्वा अमवद्वहन्त उतेशिरे अमृतस्य स्वराजः ॥१॥
हे मरुद्गणांनो ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण, बलवान, शक्तिशाली, मरुद्गणांची स्तुतियुक्त स्तोत्रांद्वारे निश्चयपूर्वक स्तुती करतो. हे स्वयंप्रकाशी, अमरत्वाचे अधिपती मरुद्गणांनो ! आपल्याकडे वेगवान अश्व आहेत. आपण स्वतःच्या बलाने वेगाने पुढे जाता ॥१॥

त्वेषं गणं तवसं खादिहस्तं धुनिव्रतं मायिनं दातिवारम् ।
मयोभुवो ये अमिता महित्वा वन्दस्व विप्र तुविराधसो नॄन् ॥२ ॥
हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! अमर्याद महिमा असलेल्या, अत्यंत तेजस्वी, शक्तिशाली, हातांत कंकणे धारण करणाऱ्या, शत्रूंचा थरकाप उडवणाऱ्या, विस्मयकारक शक्तींनी युक्त, इच्छित वर देणाऱ्या, नेतृत्व करणाऱ्या, आनंद देणाऱ्या मरुद्गणांची नतमस्तक होऊन स्तुती करावी. ॥२ ॥

आ वो यन्तूदवाहासो अद्य वृष्टिं ये विश्वे मरुतो जुनन्ति ।
अयं यो अग्निर्मरुतः समिद्ध एतं जुषध्वं कवयो युवानः ॥३ ॥
हे जल वाहून आणणाऱ्या मरुद्गणांनो ! आपण पावसाला प्रेरित करत आहात. आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती. हे सदैव तरुण, बलवान आणि ज्ञानी मरुद्गणांनो ! यज्ञामध्ये प्रदीप्त केलेल्या अग्नीने आपण प्रसन्न व्हावे ही विनंती. ॥३ ॥

यूयं राजानमिर्यं जनाय विभ्वतष्टं जनयथा यजत्राः ।
युष्मदेति मुष्टिहा बाहुजूतो युष्मत्सदश्वो मरुतः सुवीरः ॥४ ॥
हे यज्ञास पात्र असलेल्या मरुद्गणांनो ! आपण (प्रजेच्या कल्याणासाठी) पराक्रमी, गतिमान, बाहूंमध्ये प्रचंड बळ असलेला आणि शत्रूचा मुठीने संहार करणारा वीर योद्धा अशा राजाला उत्पन्न करावे ही विनंती. हे मरुद्गणांनो ! आपल्या आशीर्वादाने उत्तम अश्वयुक्त असलेले श्रेष्ठ वीर निर्माण होवोत ही विनंती ॥४ ॥

अरा इवेदचरमा अहेव प्रप्र जायन्ते अकवा महोभिः ।
पृश्नेः पुत्रा उपमासो रभिष्ठाः स्वया मत्या मरुतः सं मिमिक्षुः ॥५ ॥
रथाच्या चाकातील आऱ्यांप्रमाणे दोषरहित आणि एकामागून एक येणाऱ्या दिवसांप्रमाणे मरुद्गण आपल्या महान शक्तीने पुन्हा पुन्हा प्रकट होतात. पृश्नीमातेचे ते सर्वश्रेष्ठ आणि अत्यंत पराक्रमी पुत्र, मरुद्गण संकल्पाने सृष्टीवर पाण्याचा वर्षाव करतात.॥५ ॥

यत्प्रायासिष्ट पृषतीभिरश्वैर्वीळुपविभिर्मरुतो रथेभिः ।
क्षोदन्त आपो रिणते वनान्यवोस्रियो वृषभः क्रन्दतु द्यौः ॥६ ॥
हे मरुद्गणांनो ! जेव्हा आपण मजबूत चाके असलेल्या अंगावर ठिपके असलेले (चितळ) हरिण जोडलेल्या रथांमध्ये आरूढ होऊन पुढे निघतात तेव्हा, जलवर्षाव करणारे शक्तिशाली मेघ गर्जना करत, पाण्याच्या वेगाने जंगले तुडवत संपूर्ण आकाश गाजवून सोडतात. ॥६ ॥

प्रथिष्ट यामन्पृथिवी चिदेषां भर्तेव गर्भं स्वमिच्छवो धुः ।
वातान्ह्यश्वान्धुर्यायुयुज्रे वर्षं स्वेदं चक्रिरे रुद्रियासः ॥७ ॥

हे पराक्रमी रुद्रपुत्र मरुद्गणांनो ! जेव्हा आपण आपल्या प्रवासाला निघता, तेव्हा ही विस्तीर्ण पृथ्वी देखील आपल्याला स्वामी मानून, ज्याप्रमाणे पत्नी रक्षण करणाऱ्या पतीच्या स्वाधीन होते त्या प्रमाणे आपल्या स्वाधीन होते. आपण वेगवान अश्वांना आपल्या रथाच्या धुराला जोडता आणि घामाच्या रूपात पाऊस पाडता.॥७॥

हये नरो मरुतो मृळता नस्तुवीमघासो अमृता ऋतज्ञाः ।
सत्यश्रुतः कवयो युवानो बृहद्गिरयो बृहदुक्षमाणाः ॥८ ॥
हे नायकांनो, मरुद्गणांनो ! आपण निसर्गाच्या नियमांना जाणणारे, भूत, वर्तमान आणि भविष्य काळाचे ज्ञान असलेले सदैव तरुण आहात. महान सामर्थ्य असणाऱ्या आणि प्रचंड पाऊस पाडणाऱ्या हे मरुद्गणांनो ! आमच्यावर कृपा करून आम्हाला सुखी करावे ही विनंती. ॥८ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-५९

ऋषि- श्यावाश्व आत्रेय **देवता** – मरुद्गण **छन्द**- जगती ८ त्रिष्टुप्

प्र वः स्पळक्रन्त्सुविताय दावनेऽर्चा दिवे प्र पृथिव्या ऋतं भरे ।
उक्षन्ते अश्वान्तरुषन्त आ रजोऽनु स्वं भानुं श्रथयन्ते अर्णवैः ॥१॥

हे मरुद्गणांनो ! आपण आपले कल्याणकारी आणि दिव्यदान देणारे आपले सामर्थ्य आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांसाठी प्रकट केले आहे . आम्ही आकाशलोकांची आणि पृथ्वीलोकांची सृष्टीच्या नियमाप्रमाणे पूजा करत आहोत. आपण आपल्या वेगवान अश्वांवर पाण्याचा वर्षाव करत, वेगाने अंतरिक्ष पार करत आपले दैदिप्यमान तेज सर्वत्र पसरवता ॥१॥

अमादेषां भियसा भूमिरेजति नौर्न पूर्णा क्षरति व्यथिर्यती ।
दूरेदृशो ये चितयन्त एमभिरन्तर्महे विदथे येतिरे नरः ॥२ ॥

ज्याप्रमाणे पाण्याने पूर्ण भरलेली आणि संकटात सापडलेली नाव समुद्रात हेलकावे खाते, त्याप्रमाणे या मरुद्गणांच्या एकत्रित शक्तीच्या भयाने ही संपूर्ण पृथ्वी थरथर कापते .दूरदर्शी आणि सर्वांना ज्ञान देणारे मरुद्गण आपल्या या महान गुणांसह महान यज्ञाचे रक्षण करण्यासाठी सदैव तत्पर असतात ॥२ ॥

गवामिव श्रियसे शृङ्गमुत्तमं सूर्यो न चक्षू रजसो विसर्जने ।
अत्या इव सुभ्वश्चारवः स्थन मर्या इव श्रियसे चेतथा नरः ॥३ ॥

ज्याप्रमाणे गायींच्या डोक्यावर त्यांची उंच आणि श्रेष्ठ शिंगे त्यांच्या सौंदर्यासाठी शोभून दिसतात त्याप्रमाणे हे मरुद्गणांनो ! आपण

आपल्या मस्तकावर सौंदर्यासाठी मुकुट परिधान करता. ज्याप्रमाणे सृष्टीचा डोळा असलेले सूर्यदेव अंधार दूर करतात त्याप्रमाणे हे मरुद्गणांनो ! आपण सर्व संकटे दूर करता ॥३ ॥

को वो महान्ति महतामुदश्नवत्कस्काव्या मरुतः को ह पौंस्या ।
यूयं ह भूमिं किरणं न रेजथ प्र यद्धरध्वे सुविताय दावने ॥४ ॥
हे मरुद्गणांनो! आपल्या सारख्या महान देवांची थोरवी कोण बरं सांगू शकेल ? आपल्या दिव्य ज्ञानाला आणि पराक्रमाला समजून घेण्याची ताकद कोणात आहे? जेव्हा आपण लोकांच्या कल्याणासाठी आणि पावसाचे दान देण्यासाठी पुढे सरकता, तेव्हा आपल्या वेगामुळे ही अथांग पृथ्वी देखील एखाद्या लहान धूलिकणासारखी थरथर कापायला लागते ॥४ ॥

अश्वा इवेदरुषासः सबन्धवः शूरा इव प्रयुधः प्रोत युयुधुः ।
मर्या इव सुवृधो वावृधुर्नरः सूर्यस्य चक्षुः प्र मिनन्ति वृष्टिभिः ॥५ ॥
एकमेकांशी घट्ट जोडलेल्या आणि वेगाने धावणाऱ्या अश्वांप्रमाणे हे मरुद्गणांनो ! आपण एकत्र आला आहात . आपण युद्धाच्या मैदानात उतरलेल्या शूर वीरांप्रमाणे सोबतीने पराक्रम गाजवता. उत्तम प्रकारे वाढणाऱ्या देखण्या तरुण पुरुषांप्रमाणे हे वीर नायक मरुद्गणांनो ! आपण स्वतःचे सामर्थ्य वाढवता आणि पावसाच्या वर्षावाने सूर्यदेवांना पूर्णपणे झाकोळून टाकता. ॥५॥

ते अज्येष्ठा अकनिष्ठास उद्भिदोऽमध्यमासो महसा वि वावृधुः ।
सुजातासो जनुषा पृश्निमातरो दिवो मर्या आ नो अच्छा जिगातन ॥६ ॥

हे मरुद्गणांनो ! आपण असे आहात की, आपल्या मध्ये कोणीही ज्येष्ठ नाही आणि कोणीही कनिष्ठ नाही, तसेच आपल्यात कोणी मध्यम दर्जाचाही नाही. आपण आपल्या अथांग सामर्थ्याने आणि तेजाने एकत्र वाढता. जन्मापासून श्रेष्ठ असलेले पृश्नीमातेचे पुत्र असलेल्या, हे प्रकाशमान मरुद्गणांनो ! आपण स्वर्गातून आमच्या कल्याणासाठी यज्ञस्थळी यावे ही विनंती ॥६ ॥

वयो न ये श्रेणीः पप्तुरोजसान्तान्दिवो बृहतः सानुनस्परि ।
अश्वास एषामुभये यथा विदुः प्र पर्वतस्य नभनूँरचुच्यवुः ॥७ ॥
हे मरुद्गणांनो ! आपण विशाल आकाशाच्या उंच शिखरावरून अफाट सामर्थ्याने पक्ष्यांच्या थव्याप्रमाणे वेगाने वाहता. हे मरुद्गणांनो ! स्वर्गलोकातील आणि पृथ्वीलोकातील सर्वांना हे ठाऊक आहे की आपण पर्वतासारख्या विशाल मेघांना विदीर्ण करून पाऊस पाडता ॥७ ॥

मिमातु द्यौरदितिर्वीतये नः सं दानुचित्रा उषसो यतन्ताम् ।
आचुच्यवुर्दिव्यं कोशमेत ऋषे रुद्रस्य मरुतो गृणानाः ॥८ ॥
अदितीमाता आणि आकाश आम्हा भक्तगणांसाठी प्रकट होवोत.दवबिंदूंनी नटलेली उषादेवता (पहाट) आमच्या कल्याणासाठी प्रकट होवो. ऋषींनी केलेल्या स्तुतीने प्रसन्न होऊन हे रुद्रपुत्र मरुद्गणांनो ! आपण पाण्याने भरलेले ढग पृथ्वीवर प्रवाहित करावेत ही विनंती ॥८ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-६०

ऋषि- श्यावाश्व आत्रेय **देवता** – मरुद्गण, अग्नि **छन्द**- त्रिष्टुप् ७,८ जगती

ईळे अग्निं स्ववसं नमोभिरिह प्रसत्तो वि चयत्कृतं नः ।
रथैरिव प्र भरे वाजयद्भिः प्रदक्षिणिन्मरुतां स्तोममृध्याम् ॥१॥
श्यावाश्व आत्रेय म्हणतात," मी उत्तम रक्षक असलेल्या अग्निदेवांची नतमस्तक होऊन स्तुती करतो, त्याने प्रसन्न होऊन माझ्याकडून घडलेल्या पापांचे निवारण करावे. ज्याप्रमाणे वेगवान रथ युद्धासाठी पुढे नेले जातात, त्याप्रमाणे मी मरुद्गणांचे हे स्तुतियुक्त स्तोत्र पठण करत आहे. अनुकूल असलेल्या मरुद्गणांनी माझी समृद्धी वाढवावी ही विनंती" ॥१॥

आ ये तस्थुः पृषतीषु श्रुतासु सुखेषु रुद्रा मरुतो रथेषु ।
वना चिदुग्रा जिहते नि वो भिया पृथिवी चिद्रेजते पर्वतश्चित् ॥२ ॥
हे रुद्रपुत्र मरुद्गणांनो ! आपण ठिपके असलेली (चितळ) हरणे जोडलेल्या, सुख देणाऱ्या रथावर आरूढ झाले आहात. हे पराक्रमी मरुद्गणांनो ! जेव्हा आपण रथावर स्वार होता तेव्हा अरण्ये, पृथ्वी आणि पर्वत आपल्या भीतीने थरथर कापतात.॥२ ॥

पर्वतश्चिन्महि वृद्धो बिभाय दिवश्चित्सानु रेजत स्वने वः ।
यत्क्रीळथ मरुत ऋष्टिमन्त आप इव सध्र्यञ्चो धवध्वे ॥३ ॥
हे मरुद्गणांनो ! आपण गर्जना करत हातात शस्त्रे धरून क्रीडा करता तेव्हा आपल्या गर्जनेने बलाढ्य पर्वत भयभीत होतात, आकाशाचे

शिखर सुद्धा थरथर कापायला लागते. आपण वेगाने वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाप्रमाणे एकाच दिशेने पुढे धावता. ॥३ ॥

वरा इवेद्रैवतासो हिरण्यैरभि स्वधाभिस्तन्वः पिपिश्रे ।
श्रिये श्रेयांसस्तवसो रथेषु सत्रा महांसि चक्रिरे तनूषु ॥४ ॥
हे ऐश्वर्यवान मरुद्गणांनो ! आपण नवरदेवाप्रमाणे स्वतःच्या सामर्थ्याने आणि सोन्याच्या दागिन्यांनी आपली शरीरे चहुबाजूने सुशोभित करता. कल्याणकारी सामर्थ्यवान मरुद्गण आपल्या रथावर आरूढ होऊन आपले महान तेज स्वतःच्या शरीरावर प्रकट करतात. ॥४ ॥

अज्येष्ठासो अकनिष्ठास एते सं भ्रातरो वावृधुः सौभगाय ।
युवा पिता स्वपा रुद्र एषां सुदुघा पृश्निः सुदिना मरुद्भ्यः ॥५ ॥
हे मरुद्गणांनो ! आपल्यामध्ये मध्ये कोणीही मोठा नाही आणि कोणीही लहान नाही. आपण सर्व भाऊ सर्वांच्या कल्याणासाठी आणि परमभाग्यासाठी एकत्र वृद्धिंगत होता. नित्य तरुण रुद्रदेव आपले पिता, समृद्धीचा वर्षाव करणारी कामधेनु स्वरूप पृश्नि आपली माता आहे आपले सर्व दिवस मंगलमय असोत ॥५॥

यदुत्तमे मरुतो मध्यमे वा यद्वावमे सुभगासो दिवि ष्ठ ।
अतो नो रुद्रा उत वा न्वस्याग्ने वित्ताद्धविषो यद्यजाम ॥६ ॥
हे परम भाग्यवान मरुद्गणांनो ! आपण आकाशात अगदी सर्वोच्च स्थानी असा, मध्यम स्थानी असा किंवा सर्वात खालच्या स्थानी असा तरीही आपण आमच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती. हे रुद्रपुत्रांनो आणि अग्निदेवांनो ! आम्ही सिद्ध करत असलेल्या या यज्ञातील अर्पण केलेली हविष्यान्नाची आहुती आपण दोघांनीही स्वीकारावी ही विनंती ॥६ ॥

अग्निश्च यन्मरुतो विश्ववेदसो दिवो वहध्व उत्तरादधि ष्णुभिः ।
ते मन्दसाना धुनयो रिशादसो वामं धत्त यजमानाय सुन्वते ॥७ ॥
हे सर्वज्ञ मरुद्गणांनो आणि अग्निदेवांनो ! आपण स्वर्गाच्या सर्वोच्च शिखरांवरून आमच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती. सोमरसाने तृप्त झालेल्या, शत्रूंचा नाश करणाऱ्या,महापराक्रमी हे मरुद्गणांनो आणि अग्निदेवांनो ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना कल्याणकारी आणि सुंदर ऐश्वर्य द्यावे ही विनंती. ॥७ ॥

अग्ने मरुद्भिः शुभयद्भिऋक्वभिः सोमं पिब मन्दसानो
गणश्रिभिः । पावकेभिर्विश्वमिन्वेभिरायुभिर्वैश्वानर प्रदिवा केतुना सजूः ॥८ ॥
हे वैश्वानर सनातन अग्निदेवा ! आपण, स्वतःला सुशोभित करणाऱ्या, ऋचांचे गायन करणाऱ्या, पवित्र करणाऱ्या, सर्वांना प्रेरणा देणाऱ्या, गतिमान असलेल्या मरुद्गणांसोबत, आपल्या दिव्य प्रकाशासह आणि तेजासह प्रसन्न व्हावे आणि आनंदित मनाने या सोमरसाचे प्राशन करावे ही विनंती. ॥८ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-६१

ऋषि- श्यावाश्व आत्रेय **देवता** १-४, ११-१६ मरुद्गण ५-८ तरन्त महिषी शशीयसी ; ९ वैददश्वि पुरुमीळ्ह; १ ० वैददश्वि तरन्त ; १७-१९ दार्भ्य रथवीति

छन्द- गायत्री, ३ निचृत् गायत्री; ५ अनुष्टुप् : ९ सतो बृहती

के ष्ठा नरः श्रेष्ठतमा य एकएक आयय । परमस्याः परावतः ॥१॥
येथे एकेक करून आलेले हे सर्वात श्रेष्ठ असणारे वीर पुरुष आपण कोण आहात? ॥१॥

क्व वोऽश्वाः क्वाभीशवः कथं शेक कथा यय ।
पृष्ठे सदो नसोर्यमः॥२ ॥
हे मरुद्गणांनो! आपले अश्व कोठे आहेत ? अश्वांचे लगाम (अभीशवः) कोठे आहेत? आपण इतक्या वेगाने प्रवास करण्यास कसे समर्थ होता ? अश्वांच्या पाठीवर असणारे खोगीर कोठे आहे आणि त्यांच्या नाकपुड्यांमध्ये असणारे लगाम कोठे आहे ?॥२ ॥

जघने चोद एषां वि सक्थानि नरो यमुः । पुत्रकृथे न जनयः॥३ ॥
ज्याप्रमाणे संतान प्राप्तीसाठी स्त्रिया आपल्या मांड्या पसरतात, त्याचप्रमाणे हे पराक्रमी मरुद्गणांनो ! आपण युद्धाच्या वेळी नियंत्रित करण्यासाठी आपले पाय पसरून आश्वांच्या कंबरेच्या भागाला गती देतात॥३ ॥

परा वीरास एतन मर्यासो भद्रजानयः । अग्नितपो यथासथ ॥४॥

हे उत्तम कुळात जन्म घेतलेल्या कल्याणकारी आणि पराक्रमी मरुद्गणांनो ! आपण अग्निदेवांसारखे प्रखर तेज धारण करून प्रस्थान करावे ही विनंती. ॥४ ॥

सनत्साश्व्यं पशुमुत गव्यं शतावयम् ।
श्यावाश्वस्तुताय या दोर्वीरायोपबर्बृहत् ॥५ ॥
श्यावाश्व ऋषी म्हणतात," ज्या विदुषी राणी, शशीयसीने मी स्तुती केलेल्या वीर राजा तरंताला आलिंगन देण्यासाठी आपले बाहू पसरले त्याच राणीने मला अश्व, गायी, शेकडो मेंढ्यांचे पशुधन दान म्हणून दिले आहे"॥५ ॥

उत त्वा स्त्री शशीयसी पुंसो भवति वस्यसी ।
अदेवत्रादराधसः॥६ ॥
श्यावाश्व ऋषी म्हणतात, "निश्चितपणे, दानधर्म न करणाऱ्या नास्तिक व कंजूष पुरुषांपेक्षा शशियासी नावाची विदुषी स्त्री अधिक बुद्धिमान, श्रेष्ठ आणि अत्यंत कल्याणकारी आहे ".॥६ ॥

वि या जानाति जसुरिं वि तृष्यन्तं वि कामिनम् ।
देवत्रा कृणुते मनः ॥७ ॥
श्यावाश्व ऋषी म्हणतात," जो श्रेष्ठ पुरुष संकटात सापडलेल्या, थकलेल्या आणि तहानलेल्या लोकांच्या भावना खोलवर जाणतो, आणि जो सत्कर्माची इच्छा करणाऱ्या लोकांचे मन देवांच्या ठायी प्रवृत्त करतो, तोच खरा श्रेष्ठ आहे" ॥७ ॥

उत घा नेमो अस्तुतः पुमाँ इति ब्रुवे पणिः ।
स वैरदेय इत्समः॥८॥

श्यावाश्व ऋषी म्हणतात, "मी असे म्हणतो की विदुषी राणी शशीयसीचा पती खरोखरच स्तुतीस पात्र आहे, कारण तो वैराचा नाश करण्यासाठी सर्वांना समान रूपाने धन वाटतो. ॥८ ॥

उत मेऽरपद्युवतिर्ममन्दुषी प्रति श्यावाय वर्तनिम् ।
वि रोहिता पुरुमीळ्हाय येमतुर्विप्राय दीर्घयशसे॥९ ॥
श्यावाश्व ऋषी म्हणतात, "अत्यंत आनंद झालेल्या तरुण (रथवीती राजाची कन्या) कन्येने प्रदान केलेल्या तांबड्या (रोहित) रंगाच्या अश्वांनी मला दूरवर कीर्ती पसरलेल्या, विद्वान अशा पुरुमीळ्ह राजा कडे जाण्याचा मला मार्ग दाखविला" ॥९ ॥

यो मे धेनूनां शतं वैददश्विर्यथा ददत् । तरन्त इव मंहना॥१० ॥
श्यावाश्व ऋषी म्हणतात, "राजा विददश्वचा पुत्र राजा तरन्त याने आपल्या महान औदार्याने मला शंभर गायींचे दान दिले" ॥१० ॥

य ईं वहन्त आशुभिः पिबन्तो मदिरं मधु ।
अत्र श्रवांसि दधिरे॥११ ॥
मरुद्गण आपल्या वेगवान अश्वांवर बसून यज्ञस्थळी येतात, आनंद देणाऱ्या मधुर सोमरसाचे प्राशन करत आपली कीर्ती स्थापित करतात. ॥११ ॥

येषां श्रियाधि रोदसी विभ्राजन्ते रथेष्वा ।
दिवि रुक्म इवोपरि॥१२ ॥
हे मरुद्गणांनो! आपल्या वैभवामुळे आकाशलोक आणि पृथ्वीलोक विशेष रूपाने चमकतात. जेव्हा आपण रथामध्ये आरूढ होता तेव्हा

आपण आकाशामध्ये चमकणाऱ्या सोन्याच्या दागिन्यांमध्ये (सूर्यदेवांप्रमाणे) श्रेष्ठ स्थानी विराजमान झालेले दिसता. ॥१२ ॥.

युवा स मारुतो गणस्त्वेषरथो अनेद्यः ।
शुभंयावाप्रतिष्कुतः ॥१३ ॥
हे नित्यतरुण, पूर्णपणे निर्दोष, अजिंक्य, मरुद्गणांनो ! आपला रथ अत्यंत तेजस्वी, वेगवान, सर्वांच्या कल्याणासाठी मार्गक्रमण करणारा आहे. ॥१३ ॥

को वेद नूनमेषां यत्रा मदन्ति धूतयः । ऋतजाता अरेपसः॥१४ ॥
दैवी नियमांनुसार प्रकट झालेले, पवित्र,कंपन घडवून आणणारे, संकटे दूर सारणारे मरुद्गण नक्की कोणत्या स्थानी आनंदोत्सव साजरा करत आहेत, हे खरोखरच कोणाला बरे माहीत आहे? ॥१४ ॥

यूयं मर्तं विपन्यवः प्रणेतार इत्था धिया ।
श्रोतारो यामहूतिषु॥१५ ॥
हे स्तुतीस पात्र मरुद्गणांनो ! आपण भावपूर्ण विचारांनी मर्त्य मानवाला नेहमी सन्मार्गाकडे घेऊन जाणारे आहात. जेव्हा जेव्हा संकटाच्या वेळी आपल्याला पुकारले जाते, तेव्हा आपण ती हाक नक्कीच ऐकणारे आहात . ॥१५ ॥

ते नो वसूनि काम्या पुरुश्चन्द्रा रिशादसः ।
आ यज्ञियासो ववृत्तन॥१६ ॥
शत्रूंचा नाश करणाऱ्या, यज्ञास पात्र आणि अत्यंत आल्हाददायक असणाऱ्या हे मरुद्गणांनो ! धन घेऊन आम्हा भक्तगणांच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती ॥१६ ॥

एतं मे स्तोममूर्म्ये दार्भ्याय परा वह । गिरो देवि रथीरिव॥१७ ॥
हे रात्रीच्या अधिष्ठात्री ऊर्म्यादेवी ! ज्याप्रमाणे एखादा कुशल सारथी रथाला इच्छित स्थळी घेऊन जातो, त्याप्रमाणे आपण आम्हा भक्तगणांच्या ही स्तुतियुक्त स्तोत्रे दार्भ्याराजाकडे घेऊन जावीत ही विनंती ॥१७ ॥

उत मे वोचतादिति सुतसोमे रथवीतौ । न कामो अप वेति मे॥१८ ॥
श्यावाश्व ऋषी म्हणतात, "हे रात्रीच्या अधिष्ठात्री ऊर्म्यादेवी ! आपण माझ्या वतीने असे सांगा की सोमरस सिद्ध तयार करणाऱ्या राजा रथवीतिच्या यज्ञामध्ये स्तुती करण्याची माझी इच्छा कधीही कमी होणार नाही."॥१८ ॥

एष क्षेति रथवीतिर्मघवा गोमतीरनु । पर्वतेष्वपश्रितः ॥१९ ॥
हा ऐश्वर्यवान रथवीती राजा, पर्वतांचा आश्रय घेऊन गोमती नदीच्या तीरावर निवास करतो॥१९ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-६२

ऋषि- श्रुतविद् आत्रेय **देवता** मित्र आणि वरुण **छन्द**- त्रिष्टुप्

ऋतेन ऋतमपिहितं ध्रुवं वां सूर्यस्य यत्र विमुचन्त्यश्वान् ।
दश शता सह तस्थुस्तदेकं देवानां श्रेष्ठं वपुषामपश्यम् ॥१॥
श्रुतविद् आत्रेय म्हणतात, "सूर्यदेव आणि सूर्यदेवांच्या तेजाच्या शक्तीचे अंतिम व्यावहारिक सत्य सृष्टीच्या नियमाने झाकलेले आहे, त्या सर्वोच्च ठिकाणी सूर्यदेवांच्या रथाचे अश्व मोकळे केले जातात (तिथे पोहोचल्यावर सर्व क्रिया थांबतात). जिथे सूर्यदेवांच्या हजारो किरण-रूपी शक्ती एकत्र येऊन स्थिर होतात, तिथे मी, श्रुतविद् आत्रेयऋषींनी, सूर्यदेवांचे ते एकच असलेले सर्वश्रेष्ठ आणि अतिशय सुंदर रूप अनुभवले आहे" ॥१॥

तत्सु वां मित्रावरुणा महित्वमीर्मा तस्थुषीरहभिर्दुदुह्रे ।
विश्वाः पिन्वथः स्वसरस्य धेना अनु वामेकः पविरा ववर्त ॥२ ॥
हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो! आपल्या अगाध माहात्म्याच्या प्रभावाने सतत गतिमान असणारे सूर्यदेव दिवसामागून दिवस स्थिर असलेल्या जलाचे मेघांमध्ये रूपांतरण करतात. आपण दोघे या संपूर्ण जगाला आनंद देणाऱ्या आणि पोषण करणाऱ्या प्रवाहांना तृप्त करता, आपल्याच आज्ञेचे पालन करत आपल्या रथाचे एकुलते एक चक्र (सूर्य) अविरतपणे संपूर्ण विश्वाभोवती फिरत राहते.॥२ ॥

अधारयतं पृथिवीमुत द्यां मित्रराजाना वरुणा महोभिः ।
वर्धयतमोषधीः पिन्वतं गा अव वृष्टिं सृजतं जीरदानू ॥३॥

आपल्या महान शक्तीने पृथ्वी आणि आकाश या दोन्हींचा सांभाळ करणाऱ्या, हे राजश्री मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो! आपण आम्हांला जीवन देणारे आहात. आपण आमच्या वनस्पती आणि पिकांची वृद्धी करावी, आमच्या गायींना दुधाने समृद्ध करावे आणि पृथ्वीवर पाऊस पाडावा ही विनंती. ॥३ ॥

आ वामश्वासः सुयुजो वहन्तु यतरश्मय उप यन्त्ववर्वाक् ।
घृतस्य निर्णिगनु वर्तते वामुप सिन्धवः प्रदिवि क्षरन्ति ॥४ ॥
हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो! रथाला उत्तम प्रकारे जोडलेले आणि ज्यांचे लगाम पूर्ण नियंत्रणात आहेत असे आपले वेगवान अश्व आपल्याला आम्हा भक्तगणांच्या यज्ञस्थळी घेऊन येवोत ही विनंती. आपल्या घृतासारख्या शुद्ध रूपाचे सर्वजण अनुसरण करतात. प्राचीन आकाशलोकातून नद्या आणि पाण्याचे प्रवाह आपल्याच दिशेने वाहतात.॥४ ॥

अनु श्रुताममतिं वर्धदुर्वीं बर्हिरिव यजुषा रक्षमाणा ।
नमस्वन्ता धृतदक्षाधि गर्ते मित्रासाथे वरुणेळास्वन्तः ॥५॥
हे संकल्प करणाऱ्या, बुद्धी आणि तेज वाढवणाऱ्या मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो! ज्याप्रमाणे यज्ञातील पवित्र कुशासनाचे पवित्र स्तोत्रांद्वारे रक्षण केले जाते, त्याप्रमाणे आपण या विस्तीर्ण पृथ्वीचे रक्षण करता. आपण, आम्हा भक्तगणांच्या यज्ञस्थळी उच्च स्थानावर आनंदाने विराजमान व्हावे ही विनंती ॥५॥

अक्रविहस्ता सुकृते परस्पा यं त्रासाथे वरुणेळास्वन्तः ।
राजाना क्षत्रमहृणीयमाना सहस्रस्थूणं बिभृथः सह द्वौ ॥६॥

हे उदार बाहू असलेल्या, क्रोधरहित मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो! आपण पुण्यकर्म करणाऱ्या स्तुती करणाऱ्या भक्तगणांचे दानशूर आणि रक्षक आहात. आपण दोघे हजारो खांब असलेल्या निवासस्थानामध्ये निवास करता॥६ ॥

हिरण्यनिर्णिगयो अस्य स्थूणा वि भ्राजते दिव्यश्वाजनीव ।
भद्रे क्षेत्रे निमिता तिल्विले वा सनेम मध्वो अधिगर्त्यस्य ॥७॥
हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपल्या रथाचा सुवर्णालंकृत आधारस्तंभ विशेष रूपाने अश्वांना हाकणाऱ्या चाबकाप्रमाणे चमकत आहे. कल्याणकारी आणि सुपीक भूमी निर्माण केलेल्या, रथाच्या उच्च आसनावर विराजमान असलेल्या हे देवतांनो! आपण आम्हा भक्तगणांना मधुर अन्न प्रदान करावे ही विनंती ॥७ ॥

हिरण्यरूपमुषसो व्युष्टावयःस्थूणमुदिता सूर्यस्य ।
आ रोहथो वरुण मित्र गर्तमतश्चक्षाथे अदितिं दितिं च ॥८॥
हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो! उषादेवतेच्या उदयानंतर सूर्यदेवांचा उदय झाल्यावर आपण दोघे आपल्या मजबूत सुवर्णालंकृत आधारस्तंभ असलेल्या रथावर विराजमान होता. त्या उच्च स्थानावरून आपण दोघे अखंड(अदितिम्) आणि खंडित (दितिंच) (सत्य आणि असत्य, किंवा सृष्टीतील चांगले आणि वाईट) या दोन्ही गोष्टींवर बारीक लक्ष ठेवता . ॥८ ॥

यद्वंहिष्ठं नातिविधे सुदानू अच्छिद्रं शर्म भुवनस्य गोपा ।
तेन नो मित्रावरुणावविष्टं सिषासन्तो जिगीवांसः स्याम ॥९ ॥

हे संपूर्ण जगाचे रक्षण करणाऱ्या आणि उत्तम दान देणाऱ्या मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो आपले जे आश्रयस्थान अत्यंत विशाल, अभेद्य आणि दोषरहित आहे, त्याच्या आश्रयाने आपण आमचे रक्षण करावे ही विनंती. आपल्या कृपेने प्राप्त करण्याची इच्छा ठेवणारे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण नेहमी विजयी होऊ . ॥९ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-६३

ऋषि- अर्चनाना आत्रेय **देवता** मित्र आणि वरुण **छन्द**- जगती

ऋतस्य गोपावधि तिष्ठथो रथं सत्यधर्माणा परमे व्योमनि ।
यमत्र मित्रावरुणावथो युवं तस्मै वृष्टिर्मधुमत्पिन्वते दिवः ॥१॥
निसर्गाचे नियम आणि सत्य धर्माचे पालन करणाऱ्या हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण दोघे विशाल आकाशामध्ये आपल्या रथावर विराजमान आहात. आपण आपल्या भक्तगणांसाठी मधुर, आनंददायी पावसाचा वर्षाव करता ॥१॥

सम्राजावस्य भुवनस्य राजथो मित्रावरुणा विदथे स्वर्दृशा ।
वृष्टिं वां राधो अमृतत्वमीमहे द्यावापृथिवी वि चरन्ति तन्यवः ॥२ ॥
हे दिव्यदृष्टी, संपूर्ण विश्वाचे सम्राट मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण आमच्या यज्ञस्थळी येऊन संपूर्ण जगावर राज्य करता. आकाश आणि पृथ्वीवर ज्यावेळी विजेचा कडकडाट करत ढग फिरत असतात त्यावेळी आम्ही भक्तगण आपल्याकडे पावसाची समृद्धीची आणि अमरत्वाची अपेक्षा करतो. ॥२ ॥

सम्राजा उग्रा वृषभा दिवस्पती पृथिव्या मित्रावरुणा विचर्षणी ।
चित्रेभिरभ्रैरुप तिष्ठथो रवं द्यां वर्षयथो असुरस्य मायया ॥३ ॥
हे सर्वद्रष्टे, अत्यंत शक्तिशाली कामना पूर्ण करणाऱ्या, चक्रवर्ती मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण स्वर्गाचे आणि पृथ्वीचे अधिपती आहात. आपण आपल्या दिव्यशक्तीने गर्जना करणाऱ्या

विविध रंगबेरंगी ढगांतून आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणासाठी जलवृष्टी करावी ही विनंती. ॥३ ॥

माया वां मित्रावरुणा दिवि श्रिता सूर्यो ज्योतिश्चरति चित्रमायुधम् ।
तमभ्रेण वृष्ट्या गूहथो दिवि पर्जन्य द्रप्सा मधुमन्त ईरते ॥४ ॥
हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपल्या आकाशामध्ये पसरलेल्या दिव्य सामर्थ्याच्या प्रभावाने सूर्यदेव आपले अद्भुत आणि प्रकाशमान शस्त्र (प्रकाश) घेऊन आकाशात संचार करतात. आपण त्याच सूर्यदेवाला आकाशात ढगाने आणि पावसाने आच्छादित करता. हे पर्जन्य देवांनो ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणासाठी जलवृष्टी करावी ही विनंती. ॥४ ॥

रथं युञ्जते मरुतः शुभे सुखं शूरो न मित्रावरुणा गविष्टिषु ।
रजांसि चित्रा वि चरन्ति तन्यवो दिवः सम्राजा पयसा न उक्षतम् ॥५ ॥
हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! मरुद्गण कल्याणासाठी आपल्या सुख देणाऱ्या रथाला सज्ज करतात. ज्याप्रमाणे शूर योद्धे गायींच्या प्राप्तीसाठी युद्धामध्ये संचार करतात त्याप्रमाणे गर्जना करणारे, विविध रंगी मेघ अंतराळात सर्वत्र संचार करतात. हे महान सम्राटांनो ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांसाठी जलवृष्टी करावी ही विनंती. ॥५ ॥

वाचं सु मित्रावरुणाविरावतीं पर्जन्यश्चित्रां वदति त्विषीमतीम् ।
अभ्रा वसत मरुतः सु मायया द्यां वर्षयतमरुणामरेपसम् ॥६ ॥

हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! पर्जन्यदेव विविध रूपांनी युक्त, अन्नाची निर्मिती करणाऱ्या, तेजाने युक्त (त्विषीमतीम्) असलेल्या वाणीला बोलावत आहेत. हे मरुद्गणांनो ! आपण दिव्य सामर्थ्याने ढगाला वस्त्र परिधान करता आणि पापरहित, आरक्त वर्णीय आकाशातून आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणासाठी जलवृष्टी करता. ॥६ ॥

धर्मणा मित्रावरुणा विपश्चिता व्रता रक्षेथे असुरस्य मायया ।
ऋतेन विश्वं भुवनं वि राजथः सूर्यमा धत्थो दिवि चित्र्यं रथम् ॥७॥
हे परम ज्ञानी मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण विश्वाच्या नियमांचे पालन करत आपल्या दिव्य, महाशक्तीने सृष्टीच्या नियमांचे रक्षण करता. आपण सत्याच्या आणि वैश्विक नियमांच्या आधारे या संपूर्ण विश्वावर राज्य करता आणि आकाशात सूर्यादेवांच्या अद्भुत रथाला (प्रकाशाला) प्रस्थापित करता ॥७ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-६४

ऋषि- अर्चनाना आत्रेय **देवता** मित्र आणि वरुण **छन्द**- अनुष्टुप्, ७ पंक्ति

वरुणं वो रिशादसमृचा मित्रं हवामहे ।
परि व्रजेव बाह्वोर्जगन्वांसा स्वर्णरम् ॥१॥
शत्रूंचा नाश करणाऱ्या वरुणदेवांचे आणि मित्रदेवांचे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण पवित्र मंत्रांद्वारे आवाहन करतो. जसे गोठ्यात गायींना सुरक्षित ठेवले जाते, तसेच सर्वव्यापी आणि दिव्य प्रकाशाचा आनंद देणारे हे दोन्ही देव आम्हाला त्यांच्या दोन्ही बाहूंमध्ये सुरक्षित ठेवतात ॥१॥

ता बाहवा सुचेतुना प्र यन्तमस्मा अर्चते ।
शेवं हि जार्यं वां विश्वासु क्षासु जोगुवे ॥२॥
श्रेष्ठ बुद्धीने आणि बाहूंनी अर्पण केलेल्या हविष्यान्नाची आहुती स्वीकारणाऱ्या हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! यज्ञकर्ते भक्तगण आपल्या दोघांच्या कल्याणकारी आणि म्हातारपणाला दूर करणाऱ्या सामर्थ्याची पुन्हा-पुन्हा स्तुती करत आहेत. ॥२ ॥

यन्नूनम॒श्यां गतिं मि॒त्रस्यं यायां प॒था ।
अस्यं प्रि॒यस्य॒ शर्म॒ण्यहिंसानस्य सश्चिरे ॥३ ॥
ज्या मार्गाने उत्तम गती आणि ध्येय प्राप्त होते , त्याच मित्रदेवांच्या मार्गाचे आम्ही भक्तगणांनी अनुसरण केले पाहिजे. प्रिय आणि अहिंसक देवांच्या सुखाशी आम्ही सर्व भक्तगण सुखद आश्रयाशी जोडलेले राहो॥३ ॥

युवाभ्यां मित्रावरुणोपमं धेयामृचा ।
यद्ध क्षये मघोनां स्तोतृणां च स्पूर्धसे ॥४ ॥
हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! यज्ञकर्त्या भक्तगणांच्या निवासस्थानामध्ये समृद्धी व रक्षण वाढवण्यासाठी, आम्ही भक्तगण स्तुतियुक्त स्तोत्रे आपल्याला अर्पण करत आहोत. ॥४ ॥

आ नो मित्र सुदीतिभिर्वरुणश्च सधस्थ आ ।
स्वे क्षये मघोनां सखीनां च वृधसे ॥५ ॥
हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण आपल्या दिव्य आणि पवित्र तेजाला आमच्या यज्ञस्थळी घेऊन यावे ही विनंती. आमच्या निवासस्थानी येऊन आपण आम्हा सर्व उदार व्यक्तींची आणि आमच्या मित्रांची प्रगती व सुख-समृद्धी वाढवावी ही विनंती ॥५ ॥

युवं नो येषु वरुण क्षत्रं बृहच्च बिभृथः ।
उरु णो वाजसातये कृतं राये स्वस्तये ॥६ ॥
हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण आम्हा भक्तगणांना आपले महान सामर्थ्य प्रदान करावे. आपण आम्हाला समृद्धी मिळवण्यासाठी, ऐश्वर्य प्राप्त करून देण्यासाठी आणि आमच्या कल्याणासाठी आमचा मार्ग अडथळामुक्त व विस्तीर्ण करावा ही विनंती. ॥६ ॥.

उच्छन्त्यां मे यजता देवक्षत्रे रुशद्गवि ।
सुतं सोमं न हस्तिभिरा पड्भिर्धावतं नरा बिभ्रतावर्चनानसम्॥७॥
सूर्यदेवाच्या पहिल्या किरणांच्या वेळी यज्ञस्थळी येणाऱ्या हे पूजनीय मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण, सिद्ध केलेला सोमरस पहावा आणि अर्चनानस ऋषींवर प्रसन्न होऊन आपल्या वेगवान आणि बलवान अश्वांच्या टापांनी वेगाने धावत येथे यावे हीविनंती॥७॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-६५

ऋषि- राहतव्य आत्रेय **देवता** मित्र आणि वरुण **छन्द**- अनुष्टुप् ६ पंक्ति

यश्चिकेत स सुक्रतुर्देवत्रा स ब्रवीतु नः। वरुणो यस्य दर्शतो मित्रो वा वनते गिरः ॥१॥

ज्याला सत्याचे खरे ज्ञान आहे (चिकेत) आणि जो उत्तम बुद्धीने युक्त आहे, (सुक्रतु) त्यानेच आम्हाला त्या दिव्य सत्याचा उपदेश करावा. दर्शन देण्यायोग्य वरुणदेवांनी आणि मित्रदेवांनी ज्याच्या प्रार्थनेचा स्वीकार केला आहे , तोच आम्हाला सन्मार्ग दाखवू शकतो. ॥१॥

ता हि श्रेष्ठवर्चसा राजाना दीर्घश्रुत्तमा । ता सत्पती ऋतावृध ऋतावाना जनेजने ॥२ ॥

हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण खरोखरच सर्वश्रेष्ठ तेजाने युक्त असलेले शासक आहात . आपली कीर्ती अत्यंत दूरवर पसरलेली आहे. आपण सत्याचे पालन करणाऱ्या प्रत्येक मानवांमध्ये सत्याची वृद्धी करता. ॥२ ॥

ता वामियानोऽवसे पूर्वा उप ब्रुवे सचा । स्वश्वासः सु चेतुना वाजाँ अभि प्र दावने ॥३ ॥

हे प्राचीन मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण रक्षणासाठी आणि सहाय्यासाठी आपली प्रार्थना करतो. उत्तम श्वास घेणाऱ्या (स्वश्वासः) हे देवतांनो आम्ही यज्ञकर्ते भक्तगण शुद्ध बुद्धीने, अन्न आणि ऐश्वर्य प्राप्तीसाठी आपले आवाहन करतो. ॥३ ॥

मित्रो अंहोश्चिदादुरु क्षयाय गातुं वनते । मित्रस्य हि प्रतूर्वतः सुमतिरस्ति विधतः ॥४॥

हे मित्रदेवा ! आपण यज्ञकर्त्या भक्तगणांना संकटातून मुक्त करून विस्तीर्ण निवासस्थान आणि योग्य मार्ग मिळवून देता. हे संकटांचा नाश करणाऱ्या(प्रतूर्वतः) मित्रदेवा ! आपली कृपा सेवा करणाऱ्या भक्तगणांवर असावी ही विनंती॥४ ॥

वयं मित्रस्यावसि स्याम सप्रथस्तमे । अनेहसस्त्वोतयः सत्रा वरुणशेषसः ॥५॥

हे मित्रदेवा! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्या विशाल कृपाछत्रा खाली सुरक्षित राहू. आपल्या संरक्षणाखाली वरुणदेवांचे वंशज असलेले असलेले आम्ही भक्तगण नेहमी मर्यादेत राहू॥५ ॥

युवं मित्रेमं जनं यतथः सं च नयथः।
मा मघोनः परि ख्यतं मो अस्माकमृषीणां गोपीथे न उरुष्यतम् ॥६ ॥

हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण दोघे आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना स्नेह्याप्रमाणे सन्मार्गावर आणून प्रगतीकडे नेता. आपण उदार दात्यांचा त्याग करू नका. ऋषींच्या ज्ञानाच्या (ऋषीणाम्) रक्षणात आम्हा भक्तगणांचे आपण रक्षण करावे ही विनंती. ॥६ ॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-६६

ऋषि- रातहव्य आत्रेय **देवता** मित्र आणि वरुण **छन्द**- अनुष्टुप्

आ चिकितान सुक्रतू देवौ मर्त रिशादसा । वरुणाय ऋतपेशसे दधीत प्रयसे महे ॥१॥

हिंसक शत्रूंचा नाश करणाऱ्या, दिव्य गुणांनी युक्त, सत्याचे रूप असणाऱ्या, सर्वज्ञ आणि महान संकल्प करणाऱ्या हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आम्ही मर्त्य मानव आनंदासाठी यज्ञामध्ये हविष्यान्नाची आहुती अर्पण करत आहोत. ॥१॥

ता हि क्षत्रमविह्रुतं सम्यगसुर्यमाशाते । अध व्रतेव मानुषं स्वर्ण धायि दर्शतम् ॥२ ॥

हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण कधीही नष्ट न होणारे अद्वितीय सामर्थ्य आणि दुष्ट शक्तींचा नाश करणारी दैवी प्राणशक्ती (असुर्य) संपादन करता. ज्याप्रमाणे आकाशामध्ये सूर्यदेव दर्शनीय असतात त्याप्रमाणे मनुष्यांमध्ये (भक्तगणांमध्ये) पवित्र यज्ञकर्मे आपण स्थापित करावी ही विनंती ॥२ ॥

ता वामेषे रथानामुर्वीं गव्यूतिमेषाम् । रातहव्यस्य सुष्टुतिं दधृक्स्तोमैर्मनामहे ॥३॥

हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपल्या रथांच्या तीव्र गतीसाठी आणि त्यांच्या विस्तीर्ण मार्गासाठी आम्ही आपली आराधना करतो. हविष्य अर्पण करणाऱ्या रातहव्य ऋषींनी केलेल्या ह्या श्रेष्ठ स्तुतियुक्त स्तोत्रांचा आम्ही भक्तगण मनापासून आदर करतो ॥३॥

अधा हि काव्या युवं दक्षस्य पूर्भिरद्भुता । नि केतुना जनानां चिकेथे पूतदक्षसा ॥४॥

हे पवित्र बुद्धी आणि सामर्थ्य असलेल्या मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपल्या ज्ञानयुक्त कर्मामुळे आणि अलौकिक संरक्षक शक्तीमुळे आपण सर्व यज्ञकर्त्या भक्तगणांच्या ध्वजाला (ज्ञानबुद्धीला) पूर्णपणे जाणता॥४ ॥

तदृतं पृथिवि बृहच्छ्रवएष ऋषीणाम् । ज्रयसानावरं पृथ्वति क्षरन्ति यामभिः ॥५॥

हे विस्तीर्ण धरणीमाते ! ऋषीमुनींच्या अन्नाच्या (दिव्य ज्ञानाच्या) इच्छेसाठी आपल्या मध्ये प्रचुर प्रमाणात जल (परम सत्य) सामावलेले आहे. हे अत्यंत वेगाने गतिमान असणाऱ्या (ज्रयसानौ) मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण पर्याप्त प्रमाणात पाण्याचा वर्षाव करावा ही विनंती. ॥५ ॥

आ यद्वामीयचक्षसा मित्र वयं च सूरयः । व्यचिष्ठे बहुपाय्ये यतेमहि स्वराज्ये ॥६ ॥

हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपल्या दिव्य, सत्य आणि न्यायपूर्ण दृष्टीच्या मार्गदर्शनाखाली, आम्ही भक्तगण आणि आमचे विद्वान चहूबाजूंनी सुरक्षित असलेल्या अत्यंत विशाल अशा स्वराज्यामध्ये (स्वातंत्र्यामध्ये) प्रगती करण्यासाठी आणि त्याचे रक्षण करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहू.॥६ ॥

ई साहित्य प्रतिष्ठानचे हे एकोणिसावे वर्ष आहे. प्रा श्रीपाद काळे यांचे हे ई साहित्यवरचे सतरावे पुस्तक आहे.

प्रा श्रीपाद काळे हे विज्ञानाचे प्राध्यापक. मुंबईतील विख्यात विल्सन कॉलेजमधे त्यांनी विज्ञान शिकवले. तसेच मुंबईतील स्वा. सावरकर स्मारकामधे विविध उपक्रमांमधे ते कार्यरत आहेत. ऋग्वेद हे त्यांचे पहिलेच प्रकाशित पुस्तक.

प्रा श्रीपाद काळे यांच्यासारखे काही थोडे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), **डॉ. नितीन मोरे (६५ पुस्तके)**, अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (३), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (२३), मधू शिरगांवकर (८), **अशोक कोठारे (१०००० पानी महाभारत)**, **श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ)**, मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता

देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१२), **डॉ. वृषाली जोशी- जागतिक वाङ्मय अनुवाद (६५ पुस्तके)**, डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (४०), आनंद देशपांडे (३), डॉ. नीलिमा कुलकर्णी (५), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी (१५), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), **आसावरी काकडे** (१४), **श्याम कुलकर्णी -मूळ वाल्मिकी रामायण(३२)**, किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (८), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, **डॉ. सरोज सहस्रबुद्धे- वैद्यक विज्ञान(१८),** अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम(११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखा्नीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक(३), श्रीराम काळे (८), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी(४), रामकृष्ण बाक्रे(३), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(४), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत(२), अशोक बेंडखळे(५), सुहास साने, सुवर्णा लेले, **प्राचार्य शशिकांत कर्डेकर**(२४ भूगोल विज्ञान

विषयक), स्वाती वर्तक, भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन यादव(२), दिगंबर सलगर(४), कैलास बडगुजर, **श्रीपाद काळे- समग्र ऋग्वेद(१७)**, वैभव पाटील, चारुलता काळे, अनिल शिणगारे, स्वाती वर्तक(२), प्रमोद नाईकवाडॅ, सुधीर शास्त्री, रुपेश मराठे, सुप्रिया उपाध्ये, संजीवनी कुलकर्णी, मनोहर सुरवाडे(३), श्रेणिक सारडे (६), दिलिप ठाकूर, धनंजय कुलकर्णी, मिलिंद चौधरी, जोसेफ तुस्कानो, सुभाष धारणकर, सचिन कुल्ली(३), विश्वनाथ मानकर, अर्चना सहस्रबुद्धे असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'ई'यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव Whatsapp करा)





आधीचे मंडल
वाचण्यासाठी
इथे क्लिक करा